cmyk

## संपादकीय

### भारताच्या अवकाश संशोधनाला बळकटी

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अन्य कोणत्याही क्षेत्रांपेक्षा अवकाश संशोधन क्षेत्रात भारताची प्रगती सरस आहे. भारताची अवकाश संशोधन संस्था इस्रोने भारताला या क्षेत्रात जागतिक मानाचे स्थान निश्चितच मिळवून दिले आहे. चंद्राच्या आजवर कोणालाही न दिसलेल्या गोलार्धावर अवकाश वाहन उतरविण्याची कामगिरी करणारा भारत हा जगातील प्रथम देश म्हणून नुकताच ख्यातीप्राप्त झाला आहे. तसेच सूर्याचा अभ्यास करण्यासाठीही भारताने यशस्वीरित्या सौरयान पाठविले आहे. आता अंतराळ स्थानकात वास्तव्य करु शकेल, असा अंतराळवीरही भारताने घडविला आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकात बदल

मुंबई: इतिहासाच्या पुस्तकात आता मुघलांच्या क्रूरतेचे धडे दिले जाणार आहेत. एनसीईआरटीसकडून आठवीच्या पुस्तकात मोठे बदल करण्यात आले असून बाबर निर्दयी शासक, अकबर क्रूर पण सहिष्णू असा उल्लेख या पुस्तकात करण्यात आला आहे. तर औरंगजेब कट्टर धार्मिक आणि मंदिरं पाडणारा शासक असे वर्णन या पुस्तकात करण्यात आले आहे. दिल्ली सुल्तानशाही आणि मुघल काळाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणाऱ्या या पुस्तकात, त्या काळात 'धार्मिक असहिष्णुतेच्या अनेक घटना घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. तर, छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या इतिहासाचे गौरवपूर्ण वर्णन केले आहे. हे पुस्तक २०२५-२६ शैक्षणिक सत्रापासून शाळांमध्ये लागू केले जाईल.


बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–८३ शुक्रवार, दि.१८ जुलै २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### परिचाचारिकांचे मुंबईत आंदोलन

मुंबई-एक दिवसाच्या काम बंद आंदोलनातून मागण्या मान्य करून घेण्यासाठी राज्यभरातील परिचारिका आक्रमक झाल्या असून तब्बल ३५ हजार परिचारिकांनी कामबंद आंदोलन केले आहे. दरम्यान मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासोबतची चर्चा असफल ठरल्यानंतर हे आंदोलन करण्यात आले.

### कृत्रिम फुलांवरील बंदीसाठी आ. रोहित पाटील सरसावले

मुंबई-कृत्रिम फुलांवर बंदी घालावी शेतकऱ्यांनी आझाद मैदानात आंदोलन केले. दादर कट फ्लॉवर असोसिएशनच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आ. रोहित पाटील यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन पाठींबा दर्शवला आहे.

### राज्यातील काँग्रेस नेत्यांना हायकमांडची नोटीस

मुंबई-काँग्रेस हायकमांडच्या आदेशावरून राज्यातील काँग्रेस नेत्यांना पक्षाची नोटीस देण्यात आल्या आहेत. जनसुरक्षा विधेयकाच्यावेळी सभागृहात भूमिका का घेतली नाही यावर खुलासा मागवला आहे.

### शाईफेक प्रकरणी दीपक काटेचा जामीन मंजूर

अक्कलकोट : प्रवीण गायकवाडांवर शाई फेक प्रकरणी अटकेत असलेल्या आरोपी दीपक काटेला जामीन मिळाला आहे. वीस हजारांच्या जातमुचलक्यावर दीपक काटे आणि त्याच्या सहकाऱ्याला कोर्टाने जामीन मंजूर केला आहे.

### राज्यातल्या धरणसाठ्यात लक्षणीय वाढ

मुंबई : राज्यात जून-जुलै महिन्यात पडलेल्या दमदार पावसामुळे धरणसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. सध्या राज्याचा एकूण पाणीसाठा ६५ टक्क्यांच्या आसपास पोहोचला. गेल्या वर्षी याच दिवशी केवळ २९ टक्के जलसाठा होता. राज्यातील २,९९७ धरणांपैकी कोकण, पुणे, नाशिक आणि विदर्भातील धरणांमध्ये समाधानकारक साठा असून, यंदा पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता कमी असल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले आहे.

### शाळांच्या फीबाबत लवकरच नियमावली येणार

मुंबई : शाळांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क किती वाढवावे याबाबत काही नियम आहेत. मात्र त्याचे पालन होत नसल्याचे चित्र आहे. शाळांना याबाबत मनमानी करता येऊ नये यासाठी नवीन नियमावली लवकरच आणली जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत सांगितले. आमदारांनी त्याबाबत काही सूचना विभागाला कराव्यात, योग्य सूचना स्वीकारण्यात येतील, असेही ते म्हणाले.

### राज्यात विजेच्या दरात घट

मुंबई : इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज दर सर्वात कमी होणार आहेत. १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्यांच्या वीज दरात २६ टक्के कपात केली जाणार आहे. राज्यात १०० युनीट वीज वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या ७० टक्के आहे. या सर्वांना याचा मोठा फायदा होणार आहे. याशिवाय २५ वर्षे राज्यातील वीज दर हे स्थिर राहणार आहेत. नवीन टैरिफनुसार सध्या महाराष्ट्राचा दर ८.३२ रुपये असून, तो पुढील टप्प्यात ७.३८८ रुपयांवर येणार आहे. टैरिफ टू-अप प्रक्रियेमुळे वीज दर वाढणार नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधान परिषदेत याबाबत घोषणा केली आहे.

### जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा द्या- राहुल गांधी

नवी दिल्ली-लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याची मागणी केली आहे. त्यांनी पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहून याबाबत येत्या पावसाळी अधिवेशनात विधेयक मांडावे, असे म्हटले आहे.

# विम्यात शेतकरी बुडाला; कंपन्या मात्र मालामाल!

## सुरेश धसांचा गंभीर आरोप; एकाच अधिकाऱ्याकडून कोट्यावधींचा घोटाळा



### काय म्हणाले सुरेश धस?

"आवटे हा कृषी मंत्रालयात मागील २० वर्षांपासून फिरतोय, खासगी कंपन्यांना लाभ कसा होईल? विमा कसा शेतकऱ्यांना मिळणार नाही असे कृषी अधिकारी वागत असेल. स्कायमेटची यंत्रणा उभी करत त्यांच्याकडून हफ्ते घेत हे होत असेल तर चुकीचे आहे, असे आमदार सुरेश धस म्हणाले. यासंदर्भात चौकशी व्हावी अशी मागणीही त्यांनी केली. विनय आवटेने शेअरमध्ये विमा कंपन्यांनी गुंतवणूक केली. विनय आवटे यांनी चुकीचे काम केले. आवटेंवर ३०२ देखील लागू शकते, शेतकऱ्यांना विमे मिळाले नाही. कोणतेही कृषी आयुक्त आले तरी त्यांनाच चार्ज. मग त्यात मंत्री देखील आले. १ रुपयात विमा कोणाच्या काळात आला कोण मंत्री होता मी नाव घेणार नाही. २०२१ नंतर तुम्ही बघा असे म्हणत त्यांनी धनंजय मुंडेंवर निशाणा साधला आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

कृषी आयुक्तालयातील आणि कृषी सचिव कार्यालयातील काही अधिकारी विनय आवटेला मदत करत असल्याचा आरोप करीत तत्कालीन कृषीमंत्र्यांसह अनेकांनी कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला असल्याचा आरोप आ. सुरेश धस यांनी विधानसभेत केला आहे. दरम्यान पिकविम्यात शेतकरी बुडाला असला तरी विमा कंपन्या मात्र मालामाल झाल्या असल्याचेही ते म्हणाले. पंतप्रधान पीक विमा योजनेत कृषी आयुक्तालयातील अधिकारी व विमा कंपन्यांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी पावसाळी अधिवेशनात केला आहे. पीक विमा घोटाळ्यावर अनेक गंभीर स्वरुपाचे आरोप करण्यात आले आहेत. विनय आवटे नावाच्या व्यक्तीने खाजगी गुंतवणुकीतून ◀◀ पान २ वर

### कोण आहे विनय आवटे?

विनय आवटे मुख्य सांख्यिकी पदावर असून, इतर पदांवरही कार्यरत आहेत. एक रुपयात पीक विमा योजना ज्या कृषी मंत्र्यांच्या काळात आली, त्यांच्यापासून विनय आवटेपर्यंत सर्वांचे लागेबांधे असल्याचा दावा करण्यात आला. खोटे शेतकरी आणि सरकारी, गायरान, वन खात्याच्या जमिनींवरही पीक विमे भरले गेल्याचे आढळले. तत्कालीन कृषी मंत्र्यांवरही आरोप आहेत. कृषी निविष्ठा, नॅनो युरिया, सोयाबीन आणि कापूस घोटाळ्याची तक्रार केल्यानंतर विनय आवटेलाच चौकशी प्रमुख केल्याचा आरोप आहे.

# लाजा सोडल्या; विधानभवनाच्या लॉबीतच राडा

## जितेंद्र आव्हाड-पडळकर समर्थकांमध्ये हाणामारी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील नेते आणि कार्यकर्त्यांनी लाजा सोडल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले असून जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंड पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांजवळच दोघांचे कार्यकर्ते भिडल्याचे पाहायला मिळाले आहे.**

बुधवारी जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्यामध्ये कारचा दरवाजा लागल्याच्या कारणावरुन वाद झालेला होता. दोघांमध्ये शिविगाळ सुध्दा झाल्याचे म्हटले जात आहे. त्यानंतर गुरुवारी पुन्हा आव्हाड आणि पडळकर यांच्या



समर्थकांमध्ये वाद झाला. हा वाद रस्त्यावर नव्हे तर थेट विधिमंडळाच्या लॉबीतच झाला आहे. कडेकोट बंदोबस्त असलेल्या विधिमंडळ लॉबीत ◀◀ पान २ वर

# विद्यार्थिनीचा लैंगिक छळ प्रकरणात एसआयटी चे पथक बीडमध्ये दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये नीट या परीक्षेची तयारी करून घेणाऱ्या क्लासेस चालक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांनी लैंगिक छळ केल्याप्रकरणी या रोगावर पोस्को अंतर्गत गुन्हे दाखल आहेत याच प्रकरणाचा तपास आता मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर एसआयटी करणार असल्याने आयपीएस तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली दहा जणांचे पथक बीडमध्ये दाखल झाले आहेत.**

बीड शहरातील उमा किरण या शैक्षणिक संपला मध्ये मोठ्या प्रमाणात क्लासेस आहेत याच क्लासेस मध्ये एका विद्यार्थिनीचा विजय पवार आणि प्रशांत काटोलकर या दोघांनी लैंगिक छळ केला




याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये या दोघांविरुद्ध कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले प्रारंभी या दोघांना तीन दिवसाची आणि त्यानंतर पाच दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली पुढे पंधरा दिवसाची न्यायालयीन कोठडी देखील देण्यात आली होती हे प्रकरण विधानसभेमध्ये गाजले माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी सभागृहात आवाज उठवला त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या ◀◀ पान २ वर

# आज पुन्हा एसपी ऑफिसमध्ये एकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

**बुधवार रोजी परळी येथील ज्ञानेश्वरी मुंडे या महिलेने आपल्या पतीच्या आरोपींना अटक व्हावी यासाठी एसपी ऑफिस कार्यालयाच्या परिसरामध्ये आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता हे प्रकरण ताजे असतानाच गुरुवारी आज एस पी ऑफीस मधील भरोसा सेलच्या कार्यालयासमोरच एकाने विषारी औषध घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली.**

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात यावी या मागणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालय काल बुधवारी झालेल्या त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे येणे कार्यालयाच्या परिसरामध्ये आत्मदहन करण्याचा ◀◀ पान २ वर

# प्रेम प्रकरणातून बहिणीची हत्या फरार भावाला अखेर ठोकल्या बेड्या

**बीड । प्रतिनिधी**

**प्रेम प्रकरणातून विष प्राशन केल्या बहिणीवर दिप हॉस्पीटल मध्ये उपचार सुरू असताना तिच्यावर आणि तिच्या प्रियकरावर खुनी हल्ला झाला यात बहिणीचा मृत्यू झाल तर तिचा प्रियकर जखमी अवस्थेत सापडला या प्रकरणात गेल्या पाच वर्षापासून फरार असलेला आरोपी काळवणे याला बीड शहर पालिस ठाण्याच्या डीबी पथकाने आज बेड्या ठोकल्या .** ◀◀ पान २ वर



### विजय पवार खटोकरला न्यायालयाचा दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गाजलेल्या आणि जनतेच्यासंतापास कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या विनयभंग प्रकरणातील आरोपी विजय पवार व प्रशांत खाटोकर (उमाकिरण संकुल, बीड) यांना गुरुवार, १७ जुलै रोजी जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती शिंदे यांनी जामीन मंजूर केला आहे.

या गुन्ह्याने जिल्ह्यात खळबळ उडवून दिली होती. पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीनुसार, अश्लील फोटो काढत ◀◀ पान २ वर

# खा.भुमरेंच्या ड्रायव्हरच्या अडचणी वाढणार?

## आयकर विभागाने पाठवली नोटिस

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

माजी मंत्री खा. संदीपान भूमरे यांच्या ड्रायव्हरला आयकर विभागाची नोटिस आलेली आहे. भूमरे यांच्या ड्रायव्हरला १५० कोटींची जमीन भेट मिळाल्या प्रकरणी ही नोटिस आलेली आहे. हैद्राबादमधल्या एका व्यापाऱ्याकडून भूमरे यांच्या ड्रायव्हरला ही जमीन देण्यात आलेली होती.

खा. संदिपान भुमरे यांच्या ड्राइव्हरकडे १५० कोटी रुपयांची जमीन असल्याचा आरोप काही ◀◀ पान २ वर

# आधी ऑफर, मग बैठक; शिंदेसेनेचे टेन्शन वाढले!

## राम शिंदेंच्या दालनात अर्धा तास चर्चा; फडणवीस-ठाकरेंमध्ये नेमकं चाललयं काय?

**मुंबई। प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे आणि उध्दव ठाकरे यांच्यातून विस्तवही जात नसताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे, दोन्ही नेत्यांमध्ये सभापती राम शिंदे यांच्या दालनात अर्धातास चर्चा झाली.



बुधवारी विधिमंडळात फडणवीसांनी ठाकरेंना सत्तेत येण्याची ऑफर दिली होती. त्यानंतर ही बैठक झाल्याने दोघांमध्ये नेमकं काय चाललयं याविषयी तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. तर दुसरीकडे शिंदे शिवसेनेचे मात्र टेन्शन वाढले आहे.

एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उध्दव ठाकरे ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१७ जुलै २०२५


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | | |
| २,३५० | २,७५० | २,५५९ |
| ज्वारी/हायब्रिड : ३६.०० क्विंटल | | |
| २,००० | ३,३०० | २,६०० |
| मका/लोकल:१०.५०क्विंटल | | |
| २,१५१ | २,१५१ | २,१५१ |
| तूर :३.०० क्विंटल | | |
| ६,३०० | ६,५०० | ६,३७५ |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २९.०० क्विंटल | | |
| २,२०० | २,८३१ | २,६०५ |
| मुग: ०.५० क्विंटल | | |
| ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | | |
| ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | | |
| ५,५९० | ५,५९० | ५,५९० |

# दीपा मुधोळ-मुंडे आता समाजकल्याण विभागाच्या आयुक्त

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे महापालिका परिवहन विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ मुंडे यांची समाजकल्याण विभागाच्या आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली असून तसे आदेश अप्पर मुख्य सचिव व्ही राधा यांनी दिले आहेत.**



बीडच्या तात्कालिन जिल्हाधिकारी तथा पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या अध्यव व व्यवस्थापकीय संचालक दिपा मुधोळ यांची आता समाजकल्याणच्या आयुक्त (पुणे) पदी बदली झाली आहे. यासंदर्भात सेवा विभागाचे अप्पर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी गुरूवारी आदेश काढले आहेत. तसेच त्यांनी या पदाचा तात्काळ पदभार स्विकारावा, असे या आदेशात म्हटले आहे. दीपा मुधोळ मुंडे या धाराशिव,बीड या ठिकाणी जिल्हाकारी म्हणुन होत्या त्याचा बीडयेथील अत्यंत चांगला गेला या काळामध्ये त्यांनी उसतोड मंजुरांच्या आरोग्यासाठी आरोग्य हेलथ कार्ड ही योजना राबवली त्या सोबतच किसान कार्ड सारखी योजना केंद्राने जाहिर केली होती. त्यामध्ये महाराष्ट्रात केवळ बीड जिल्ह्याचा ◀◀ पान २ वर

# जिल्ह्यातील ३३६ शिक्षक होणार उच्चशिक्षित

## शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी उच्च शिक्षणास दिली मान्यता

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं आणि शिक्षणाला वयाचे बंधन देखील नाही अशातच बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी पुढील शिक्षणासाठी माननीय संदर्भात सादर केलेल्या प्रस्तावावर आज शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी मोहर लावली बीड जिल्ह्यातील ३३६ शिक्षकांना पुढील शिक्षण घेण्याची परवानगी दिल्याने त्या शिक्षका आनंदाचे वातावरण आहे.**

जिल्हा परिषदेच्या सेवेमध्ये डीएड धारक पदवी घेतलेल्या सेवेतील शिक्षकांनी पदोन्नती आणि वेतन वाढीसाठी पुढील शिक्षण घेण्याची परवानगी




मागितली होती शिक्षण सेवक यांना पात्रता वाढवण्यासाठी पदवी पदव्युत्तर परीक्षा बी ए ,एम ए, बी एड बीपी एड, पीएचडी सह व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी मंजुरी शिक्षण विभाग कडे मागण्यात आली होती त्यानुसार आज बीड जिल्ह्यातील ३३६ शिक्षकांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाने सी ई ओ यांच्या मान्यतेनंतर मंजुरी देण्यात आली बहुतांशी शिक्षक हे बीएड बीएस्सी सीईटी एम एड एम फिल केंद्रप्रमुख बीएड तर काही पीएचडी साठी देखील आहे बीएससी बीएड एम ए बी ए सी पी सी टी अशा उच्च शिक्षणासाठी या सर्व शिक्षकांनी विनंती अर्ज दाखल केले होते आज जिल्ह्यातील जवळपास ◀◀ पान २ वर

# ज्ञानेश्वरी मुंडेंची खा.सोनवणेंनी घेतली भेट; भाऊ म्हणून पाठीशी राहू



**बीड । प्रतिनिधी**

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी (दि.१६) सकाळी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेर कुटुंबासह आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून दि.१७ जुलै रोजी सायंकाळी खा.बजरंग ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भारताच्या अवकाश संशोधनाला बळकटी

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अन्य कोणत्याही क्षेत्रांपेक्षा अवकाश संशोधन क्षेत्रात भारताची प्रगती सरस आहे. भारताची अवकाश संशोधन संस्था इस्रोने भारताला या क्षेत्रात जागतिक मानाचे स्थान निश्चितच मिळवून दिले आहे. चंद्राच्या आजवर कोणालाही न दिसलेल्या गोलार्धावर अवकाश वाहन उतरविण्याची कामगिरी करणारा भारत हा जगातील प्रथम देश म्हणून नुकताच ख्यातीप्राप्त झाला आहे. तसेच सूर्याचा अभ्यास करण्यासाठीही भारताने यशस्वीरित्या सौरयान पाठविले आहे. आता अंतराळ स्थानकात वास्तव्य करु शकेल, असा अंतराळवीरही भारताने घडविला आहे. शुभांशू शुक्ला या इस्रोशी संबंधित अंतराळवीराने अमेरिका आणि रशिया यांनी संयुक्तरित्या निर्माण केलेल्या अंतराळ संशोधन केंद्रात वास्तव्य केले आणि तो मंगळवारी त्याच्या अन्य सहकाऱ्यांसह पृथ्वीवर सुखरुप परतला. या अंतराळ अभियानात भारताने जवळपास साडेपाचशे कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. मानवसहित अंतराळ यान अवकाशात पाठविण्याची आणि ते परत आणण्याची महत्त्वाकांक्षी योजना इस्रो २०२७ मध्ये हाती घेणार असून या योजनेचा एक भाग म्हणून शुभांशू शुक्ला याच्या अंतराळ स्थानक वास्तव्याकडे पाहिले जात आहे.

अलीकडच्या काळात अंतराळ प्रवास, अंतराळ स्थानकात वास्तव्य आणि तेथून परत येणे हे विशेष अवघड किंवा दुर्मिळ राहिलेले नाही. असे असले तरी, शुभांशू शुक्ला आणि त्याच्या माध्यमातून इस्रो यांची ही कामगिरी कौतुकास्पदच आहे. कारण अंतराळात मानव पाठविण्याची भारताची महत्त्वाकांक्षा आहे. ही महत्त्वाकांक्षा साध्य झाल्यास भारत स्वतंत्ररित्या आणि स्वबळावर अशी कामगिरी करणारा जगातील चौथा देश ठरणार आहे. यापूर्वी अमेरिका, रशिया आणि चीन यांनी हे साध्य केले आहे. त्यामुळे या संदर्भात भारत एक 'महाशक्ती' म्हणून गणला जाईल हे निश्चित आहे. स्वत: शुभांशू शुक्लाही भारताच्या या 'गगनयान' अभियानात सहभाग घेणार आहे. त्यामुळे यावेळी त्याने मिळविलेला अनुभव त्याला आणि भारताला 'गगनयान' अभियानात उपयोगी पडेल. भविष्यकाळासाठी भारताने अवकाश संशोधनाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना मनाशी ठरविल्या असून त्यांना बळ देणारी कामगिरी शुभांशू शुक्ला याने केली आहे. अशा प्रकारे भारताचा अवकाश कार्यक्रम पुढे झेपावत असताना, अशा कार्यक्रमांना आक्षेप घेणाऱ्यांचीही संख्या कमी नाही. भारतासारख्या 'गरीब' देशाने अवकाश संशोधनासारख्या प्रचंड खर्चाच्या आणि त्यामानाने लाभदायक नसलेल्या योजना कशाला हाती घ्याव्यात? हाच पैसा गरीबांवर खर्च का करु नये? एवढी गुंतवणूक करुनही भारत आज अमेरिका, रशिया, चीन आदी देशांपेक्षा या क्षेत्रात मागेच आहे ना? मग अवकाश संशोधनाचा एवढा ध्यास कशासाठी? इत्यादी अनेक नकारात्मक प्रश्न अनेकांना केवळ त्यांच्या अज्ञानापोटी पडत असतात. गरिबी दूर करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत यावर कोणाचेही दुमत नाही. यासाठी शक्य तितका खर्चही करण्याचे उत्तरदायित्वही सरकारचे असते, हे निर्विवाद आहे. तथापि, भारताचा अंतराळ संशोधनाचा खर्च त्याच्या एकंदर स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या एक दशांश टक्काही नाही. त्यामुळे तेव्हढा पैसाही खर्च करु नये, असे म्हणणे, हे 'दात कोरुन पोट भरण्या'सारखे निरर्थक आहे. अंतराळ संशोधन आणि अंतराळाचा उपयोग अर्थव्यवस्था प्रगत करण्यासाठी करणे ही आजच्या युगात एक महत्वाची बाब मानली गेली आहे. आजचे युग हे संपर्क युग आहे. अत्याधुनिक संपर्क तसेच दूरसंचार तंत्रज्ञान ज्या देशाकडे असेल तो जगाला भारी ठरु शकतो, अशी स्थिती आहे. दूरसंचाराची, अर्थात टेलिफोन्स, मोबाईल फोन्स, इंटरनेट आणि इतर साधनांची व्यवस्था अंतराळात सोडलेल्या उपग्रहांवर अवलंबून आहे. या संदर्भात आपण विदेशी उपग्रहांवर अवलंबून राहू शकत नाही. कारण, तसे केल्यास आपले दूरसंचार क्षेत्रातील स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते. ही बाब देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही अडचणीची ठरु शकते. त्यामुळे दूरसंचार क्षेत्रात 'आत्मनिर्भर' होणे ही आपली महत्त्वाची आवश्यकता आहे. अवकाश संशोधन कार्यक्रमाला प्राधान्य दिल्याशिवाय आपण हे साध्य करु शकत नाही. अवकाश संशोधन म्हणजे केवळ चंद्रावर यान पाठविणे किंवा मानवाला अंतराळ प्रवास घडविणे एवढ्यापुरते मर्यादित नाही. तर आपल्या अर्थव्यवस्थेचीही वाढ आणि प्रगती अंतराळ संशोधनात आणि उपग्रहीय तंत्रज्ञानात आपण किती पुढे आहोत, यावर अवलंबून आहे, हे असे रडवे प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. भारतासारख्या 'गरीब' मानल्या जाणाऱ्या देशाने कोरोनाचा उद्रेक, बलाढ्या देशांपेक्षाही अधिक चांगल्या रितीने थोपविला, हे दूरसंचार क्रांतीमुळेच शक्य झाले. त्याचप्रमाणे नुकत्याच पाकिस्तान विरोधात घडविलेल्या 'सिंदूर अभियाना'च्या मोठ्या यशातही इस्रोच्या अवकाश संशोधनाचा आणि अवकाश तंत्रज्ञानाचा निर्णायक सहभाग राहिला आहे, हे नोंद करण्यासारखे आहे. त्यामुळे भारताला आपली अर्थव्यवस्था अधिक बळकट आणि प्रगत करायची असेल, तर, आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, उद्योगव्यवस्था, कृषीव्यवस्था, ऊर्जानिर्मिती व्यवस्था आदी क्षेत्रांचा भरभक्कम विकास होण्याची आवश्यकता आहे. यासाठी भारताने दूरसंचार क्षेत्रात जगातील पहिल्या तीन राष्ट्रांच्या तोडीस तोड कामगिरी केली पाहिजे. कारण आजच्या युगात या सर्व क्षेत्रांमध्ये वाढ आणि प्रगती साधायची असेल, तर दूरसंचार क्षेत्रात आपण स्वबळावर अग्रेसर असलेच पाहिजे. दूरसंचार क्षेत्रात आघाडीवर राहण्यासाठी आपल्याला आतापेक्षाही मोठ्या प्रमाणावर अवकाश संशोधन आणि अवकाश तंत्रज्ञान विकास क्षेत्रात गुंतवणूक करावी लागणार आहे. देशाची अर्थव्यवस्था बळकट झाली, तरच देशाच्या सरकारचे उत्पन्न वाढणार. तसे उत्पन्न वाढले तरच सरकार गरिबांचे अधिकाधिक कल्याण करु शकेल. अन्यथा, गरिबांच्या कल्याणाची भाषा केवळ गरिबांच्या नावाने आगखाऊ भाषा करण्यापुरतीच मर्यादित राहील. प्रत्यक्षात गरिबी दूर करणे शक्यच होणार नाही. अवकाश संशोधन, अवकाश तंत्रज्ञान विकास आणि गरिबी उन्मूलन यांचा असा हा अन्योन्य संबंध आहे. हे लक्षात घेतल्यास अवकाश संशोधन आणि तंत्रज्ञान किती महत्त्वाचे आहे, हे समजून येते. त्यामुळे संकुचित मनोवृत्ती आणि अर्थसंबंधातील अज्ञान दूर करुन याकडे पाहण्याची आवश्यकता आहे.

# नफरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी गिरवला लोकशाहीचा धडा

## शालेय मुख्यमंत्री पदासाठी केले मतदान

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शा.नफरवाडी येथे शालेय मुख्यमंत्री पदाची निवडणूक ईव्हीएम मशीनच्या सहाय्याने घेण्यात आली. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे,मतदार यादी प्रसिद्ध करणे,अर्जाची छाननी करणे, सूचक,अनुमोदक,अपूर्ण अर्ज बाद करणे,अर्ज मागे घेणे, प्रचार करणे या सर्व बाबी करण्यात आल्या. मतदान कक्ष,मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी नेमण्यात आले.शेवटी मतदान घेवून निकाल जाहीर करण्यात आला. या उपक्रमातून लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.**




भारतीय लोकशाहीतला प्रौढ मताधिकार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजला, योग्य उमेदवार निवडणे,प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेणे इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करणे या जबाबदाऱ्यांची अनुभूती विद्यार्थ्यांना आली. आई-वडील किंवा घरातील इतर प्रौढ व्यक्ती मतदान करतात मग ती प्रक्रिया कशी असेल ? विद्यार्थ्यांचा मनातील या जिज्ञासेचे उत्तर स्वतः विद्यार्थ्यांना कृतीतून मिळाले. प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणे शाळेतील शिक्षकांच्या संकल्पनेतून शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले या मध्ये ॲप च्या माध्यमातून ईव्हीएम मशीन तयार करण्यात आले त्यावर उमेदवारांचे नाव आणि फोटो ॲड करून बॅलेट आणि कंट्रोल युनिट तयार करण्यात आले.इच्छुक उमेदवारांना प्रचारासाठी दोन दिवस वेळ देण्यात आला.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अभिरुप मतदानाचे प्रात्यक्षिक दाखवून मतदान प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.या निवडणुकीसाठी ९ उमेदवार आणि शेवटी अशी रचना वर करण्यात आली होती.सदरील ईव्हीएम वर आजची मतदान प्रक्रिया पार पडली.शाळेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक यांनी सहभाग घेतला.एकूण मतदान ११८ झाले.शेवटी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व उमेदवार व मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर मतमोजणी करून निकाल जाहीर केला, शाळेतील विद्यार्थिनी चैताली बाळू ढोले हिला ६० मतदान झाले तिला ४८ मतांनी विजेता घोषित करण्यात आले.तद्नंतर शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री चैताली हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.चैताली ढोले हिने आपले मनोगत व्यक्त करून सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले.या निवडीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी तु चाल पुढं तुला रं गड्या भिती कशाची या गीतावर ठेका धरत नृत्य करत आनंद साजरा केला. उमेदवार म्हणून चैताली ढोले,सोहम मंडलिक,जयराम वाघ,विठ्ठल दराडे,दिपाली ढोले,दर्शन मंडलिक,काजल दराडे,राधिका मंडलिक, भूमिका मंडलिक हे होते. प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये केंद्राध्यक्ष सोहम वायकर आणि श्रेयस ढेरे,मतदान अधिकारी १ आरती सवासे,मतदान अधिकारी २ सविता मुळे,मतदान अधिकारी ३ कल्याणी तळेकर तसेच मतदान प्रतिनिधी म्हणून समृद्धी तांबे,सुजाता सस्ते,साक्षी तांबे,महेश दराडे यांनी कामकाज केले.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे सर तसेच शाळेतील शिक्षक सचिन राऊत सर, रमेश मुरूमकर सर,शकुंतला काकडे मॅडम,सारिका वावरे मॅडम यांनी काम पाहिले.

# सेवा सप्ताह अंतर्गत वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अंतर्गत दुसऱ्या दिवशी दि १६ बुधवार रोजी मोदी लर्निंग सेंटरच्या प्रांगनाभोवती विविध झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच गुरुवार दि १७ रोजी मानव विकास अपंग व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेनुसार १५ ते २२ जुलै दरम्यान आज दुसऱ्या दिवशी दि १६ रोजी वृक्षारोपनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या अंतर्गत मोदी लर्निंग सेंटरच्या भव्य अशा प्रांगनाभोवती विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.त्याचबरोबर गुरुवारी जोधाप्रसादजी मोदी तसेच मानव विकास अपंग व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पेन, पेन्सिल चित्रकला वही, रंग पेन्सिल आदींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या संकल्पनेखाली सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने १५ ते २२ जुलै दरम्यान सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेवर आधारित अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण,स्वच्छता, शिक्षण तथा सामाजिक जनजागृती यावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यातच दि १५ रोजी रक्तदान शिबीर आयोजित करून त्यात ६३ युवकांनी स्वेच्छेने रक्तदान केले. बुधवार दि १६ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे वृक्षारोपण करण्यात आले. यापुढेही संपूर्ण सप्ताहभर अशाच विधायक उपक्रमांची मेजवानी असणार आहे. सेवा सप्ताह उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण तसेच शालेय साहित्य वाटपाच्या कार्यक्रमात मनोज लखेरा, मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले,महादेव आदमाने, चंद्रकांत महामुनी, दिनेश भराडीया, अमोल लोमटे, यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

# २१ वर्षा पासून फरार असलेल्या आरोपीस माजलगाव शहर पोलीसांनी ठोकल्या बेड्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

फिर्यादी नामे सटवा बापुराव नेमाने हा गुंज, ता. पाथरी, जिल्हा परभणी येथील रहिवासी आहे. त्याच्याकडे ६१ मेंढ्या आणि १२ शेळ्या होत्या. दि ०७ एप्रिल २००४ रोजी संध्याकाळी ७.०० ते ८.०० वाजेच्या सुमारास त्याने गुंजथडी गावातील दत्तात्रय तांगडे यांच्या शेतात मेंढ्या आणि शेळ्या बांधल्या.त्यावेळी लक्ष्मण रामभाऊ राहुभूत,त्याचे दोन मुलगे नामदेव आणि विष्णु, शेताचे मालक दत्तात्रय मुंजाभाऊ तांगडे आणि नारायण गणपत तांगडे त्याच्यासोबत होते. माहिती देणारा आणि लक्ष्मण वगळता ते सर्व झोपले होते. ८.एप्रील २००४ रोजी मध्यरात्री १२.०० ते १.०० वाजेच्या सुमारास, खबर देणाऱ्याने लक्ष्मणला झोपायला सांगितले आणि तोही झोपला.अचानक एक व्यक्ती त्याच्या जवळ आली आणि आवाज करू नको असे म्हणत त्याने काठीने त्याच्यावर हल्ला केला. दरम्यान,लक्ष्मण उठवण्याचा प्रयत्न करत असताना, त्याच वेळी कोणीतरी काठीने त्याच्या डोक्यावर हल्ला केला, ज्यामुळे त्याचे डोके फुटले.त्यावेळी इतर सर्वजण झोपले होते.जेव्हा त्या व्यक्तीने खबऱ्याची मेंढ्या पळवून नेली, तेव्हा काही वेळाने खबऱ्या आणि इतरांना स्वतःला सोडता आले. त्यांनी एकमेकांचे हातपाय उघडले.ते सर्व घाबरले. त्यामुळे त्यांनी कोणताही आवाज केला नाही.त्यानंतर खबऱ्या गुंजथडी गावात गेला आणि तेथून त्याने माजलगाव येथील त्याच्या नातेवाईकांना फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर तो गुंज येथे गेले आणि पाथरी पोलिस ठाण्यात माहिती देण्याचा प्रयत्न केला,परंतु फोन कनेक्ट झाला नाही. त्यानंतर तो गुंजहून पुन्हा गुंजथडी गावात गेला आणि ग्रामस्थांच्या मदतीने मेंढ्याची झडती घेतली,परंतु मेंढ्या सापडली नाहीत. त्यानंतर तो पुन्हा पोलिस ठाण्यात आला आणि दि ८ एप्रील २००४ रोजी दुपारी २.०० वाजत त्याने ४ अज्ञात चोरांविरुद्ध त्याच्या ५५ मेंढ्या आणि १,००० रुपये अशी एकूण ३३,००० रुपये चोरीला गेली असल्याची तक्रार दाखल केली.सदर तक्रारीच्या आधारे आरोपी आणि इतरांविरुद्ध भारतीय दंड कलम ३९५,३४२ आर.डब्ल्यू.१४९ अंतर्गत गुन्हा क्रमांक ८४/२००४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सुरू करण्यात आला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले आणि घटनास्थळी पंचनामा तयार केला. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुद्ध माजलगाव न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर यातील आरोपी नामे आप्पा महीपती पवार वय-४० वर्ष व्यवसाय रिक्षा चालक रा.कोटाळा ता.सोनपेठ जि. परभणी स्वताची ओळख लपवुन मागील २१ वर्षा पासुन फरार होता.दिनांक १६ जुलै २०२५ रोजी गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती मीळाली की,गुन्हा क्र.८४/२०२४ कलम ३९५,३४२ भा.द. वी.आर.डब्ल्यू.१४९ मधील पाहीजे फरारी आरोपी नामे आप्पा महीपती पवार वय-४० वर्ष व्यवसाय रिक्षा चालक रा.कोटाळा ता.सोनपेठ जि.परभणी हा सोनपेठ येथील रिक्षा पॉईंट येथे आहे त्यावरुन त्यास सोनपेठ येथुन तांत्रीक विष्लेशनाद्वारे शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले व पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे आणले. त्याचे अटकेची प्रक्रीया करुन गुन्ह्या संदर्भाने तपास केला असता त्याने काहि एक सहकार्य केले नाही व त्यास न्यायालयात हजर केले व न्यायालयाने न्यायालयीन कोठडी मंजुर केल्याने त्यास जिल्हा कारागृह बीड येथे दाखल केले.सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव शहर, पोउपनि के.बी. माकणे, पोह/१४६० शेख, पोशि/१९२६ चव्हाण, पोशि/२२९९ थापडे, पोशि/२०८ पोकळे यांनी केली आहे.

# पान १ वरून...

## विम्यात शेतकरी बुडाला;

व्याज कमावले, मात्र शेतकऱ्यांना विमा दिला नाही. कृषी आयुक्तालयातील आणि कृषी सचिव कार्यालयातील काही अधिकारी विनय आवटेला मदत करत असल्याचा आरोप आ. सुरेश धस यांनी केला आहे.

----------

## विद्यार्थिनीचा लैंगिक छळ प्रकरणात

चौकशीसाठी एसआयटीची स्थापना केली आयपीएस अधिकारी असलेल्या तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली एस आय टी स्थापन करण्यात आले असून या टीम मध्ये जवळपास दहा हिला आणि पुरुष अधिकाऱ्याचा कर्मचाऱ्यांचा समावेश असून ही समिती बीडमध्ये दाखल झाली आहे या समितीकडून आता सर्व बाजूने तपास केला जाणार असून या प्रकरणातील आता सर्व काही बाहेर येण्याची शक्यता आहे यासोबतच विजय पवार यांचे इंग्लिश स्कूल देखील असून याच इंग्लिश स्कूलमध्ये देखील एका विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये दुसरा गुन्हा दाखल आहे या सर्व प्रकाराची एसटी कडून चौकशी केली जाणार असून चौकशीनंतर हा अहवाल गृहमंत्री यांना दाखल केला जाणार आहे विशेषतःच आव्हान न्यायालयामध्ये देखील आरोपी असलेल्या विजय पवार आणि प्रशांत खातो का यांच्याविरुद्ध दाखल केला जाणार आहे चौकशी मधून काय बाहेर येते याकडे जिल्ह्यातील जनतेचे आणि विशेषता पालकांचे लक्ष लागले आहे

-------------

## लाजा सोडल्या; विधानभवनाच्या

तुफान हाणामारी झाली. यात आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना पडळकरांचे समर्थक टकले यांच्यासह दोघांनी मारहाण केली. बराच गोंधळ झाल्यावर त्या ठिकाणी असलेले सुरक्षा रक्षक धावले. आता नेत्यांसह त्यांच्या कार्यकर्त्यांनी लाजा सोडल्याचे दिसत आहे. दरम्यान, या विधानभवनाच्या लॉबीत झालेल्या मारहाणीचा मुद्दा विधानसभेत देखील गाजला. अनेक आमदारांनी चिंता व्यक्त केली आहे. विधानभवनात येताना अडचणी येत असल्याचे आमदार सना मलिक यांनी आरोप केला आहे.

**दोषींवर कडक कारवाई होईल-फडणवीस**

घडलेली घटना ही अतिशय चुकीची आहे. विधानभवनात अशा प्रकारची घटना घडणे योग्य नाही. विधानसभेचे अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती यांच्या अंतर्गत विधानभवनाचा परिसर येतो. त्यामुळे या दोघांनीही घडलेल्या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच यावर कडक कारवाई करावी अशी विनंती मी त्यांना केल्याचेही त्यांनी माध्यमांना सांगितले.

**..तर आमदार राहायचे कशाला?-आव्हाड**

विधानसभेत आमदार सुरक्षीत नसतील तर कशाला राहायचे आमदार? असा संतप्त सवाल यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. तो मवाल्यासारखा येतो आणि आमच्या आया बहिणीवरुन शिव्या देतो, त्याला ऑफिशियल लॅग्वेंज म्हणून डिक्लेर करा ना असे म्हणत आव्हाडांनी पडळकरांवर टीका केली.

**बावन्नकुळेंच्या भेटीनंतर पडळकरांची दिलगिरी**

दरम्यान, या घटनेनंतर प्रसारमाध्यमांनी गोपीचंद पडळकर यांच्याशी देखील संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी उत्तर देण्यास टाळाटाळ केली. पुढे त्यांनी मंत्री चंद्रशेखर बावन्नकुळे यांची भेट घेल्यावर झालेल्या घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

**विधानसभा अध्यक्षांनी अहवाल मागितला**

दरम्यान, जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या मारहाणीसंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अहवाल मागितला आहे. याबाबत बोलताना राहुल नार्वेकर म्हणाले की, मी अहवाल मागितला आहे, अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कारवाई करेल असे नार्वेकर म्हणाले.

-----------

## विजय पवार खटोकरला

विनयभंग केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात संबंधित पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींना अटक केली होती. पोलीस कोठडी संपल्यानंतर दोघे न्यायालयीन कोठडीत होते. जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान आरोपींच्या वतीने प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी जोरदार युक्तिवाद करत आरोपींना जामीन मिळावा अशी मागणी केली. त्यांना ॲड. गणेश कोल्हे, ॲड. संज्योत महाजन, ॲड. योगेश सुरवसे, ॲड. अभिजीत चौरे, ॲड. धनराज जाधव व ॲड. सोनवणे यांनी सहकार्य केले.

-------------

## प्रेमप्रकरणातून बहिणीची हत्या

२०१४ मध्ये झालेल्या या घडनेत स्वतःच्या बहिणीला रूग्णालयात उपचार सुरू असताने जिवघेणे हल्ला केला. यात तिचा मृत्यू झाला होता तर बहिणीचा प्रियकर जखमी झाला होता. हा ऑनर किलिंगचा हा प्रकार होता. परंतु खुनाच्या गुन्ह्यात शिक्षा झालेला हा आरोपी गेल्या पाच वर्षापासून फरार झालेला होता.पोलिसांचा ताबा चुकऊन तो फरार झाल्याने याबाबत पो.ठा. शिवाजीनगर, बीड येथे गु.र.नं. ७८१/२०१८ भा.दं.वि. कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात मा. न्यायालय, बीड येथे कलम २९९ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली होती. तसेच जिल्हा शोधपत्र देखील तयार करण्यात आले होते परंतु पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी याबाबत जे गंभीर गुन्ह्यात फरार आरोपी आहेत त्यांना पकडण्याची मोहीम काढलेली आहे. या मोहिमे अंतर्गत अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७/०७/२०२५ रोजी पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी एक विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश जाधव, पो.ह. गहिनीनाथ बावनकर, पो.अ. राम पवार या तपास पथकाने सतर्कपणे काम करत सदर फरारी आरोपी विठ्ठल उर्फ सोनू प्रकाश काळवणे यास शोधून ताब्यात घेतले आहे.सदर आरोपीस अटक करून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असून त्यास न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. या यशस्वी कारवाईबद्दल तपास पथकाचे व मार्गदर्शक अधिकाऱ्यांचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अभिनंदन केले आहे.

-------------

## आज पुन्हा एसपी ऑफिसमध्ये

प्रयत्न केला होता या प्रकरणामुळे चांगलीच खळवळ उडालेली असताना आज दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी दुपारी साडेअकरा ते बाराच्या दरम्यान शिरूर कासार तालुक्यातील बबन श्रीराम पाखरे यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला मात्र तेथील कर्मचाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे मोठा अनर्थ टळला ही घटना आज सकाळी भरोसा असेल कार्यालयाच्या बाहेर घडली हा प्रकार कौटुंबिक वादातून घडला असल्याचे सांगण्यात येते तोच वाद मिटवण्यासाठी भरोसा असेल मध्ये आले होते मात्र बबन श्रीराम पाखरे यांनी विषारी औषध घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला त्याचवेळी भरोसा असेल मधील कर्मचाऱ्यांनी हा प्रकार रोखल्यामुळे आनंद कळला पाखरे यांची समजूत काढत त्यांना वरिष्ठाकडे पाठवले वरिष्ठांनी त्याची समजूत काढली. या प्रकरणी बबन श्रीराम पाखरे रा.पौडूळ ता.शिरूर यांच्या विरोधात पो.का. क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

------------

## आधी ऑफर, मग बैठक;

शिवसेना यांच्यातून विस्तवही जात नाही. दोन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर चिखलफेक करीत आहेत. तर दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे हे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनामध्ये ही महत्त्वाची बैठक पार पडली आहे. बुधवारी देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निरोपसमारंभाप्रसंगी जोरदार टोलेबाजी केल्याचे पाहायला मिळाले होते. फडणवीस यांनी यावेळी विधानभवनात बोलताना उद्धव ठाकरे यांना थेट सत्तेत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले होते. तुम्हाला इकडे स्कोप आहे, तुम्ही येऊ शकता, असे त्यांनी म्हटले होते. दरम्यान फडणवीसांच्या या ऑफरनंतर गुरुवारी उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची बैठक पार पडल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. दरम्यान विधिमंडळात थेट सत्तेत येण्याचे उध्दव ठाकरेंना फडणवीसांनी निमंत्रण दिल्याने शिंदे शिवसेनेच्या भुवया उंचावल्या होत्या. त्यातच ठाकरे-फडणवीस यांच्या भेटीमुळे तर एकनाथ शिंदे यांचे टेन्शन वाढवले आहे. उध्दव ठाकरे सत्तेत आले तर शिंदे व त्यांच्या मंत्र्यांचे काय होणार यावरच सध्या जोरदार चर्चा सुरु आहे.

### नेमकी कशावर चर्चा

उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, या भेटीत आदित्य ठाकरे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांना 'हिंदीची सक्ती हवीच कशाला' हे पुस्कत देखील भेट दिले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार विरोधी पक्ष नेतेपद, त्रिभाषा सूत्र आणि हिंदीसक्ती या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली आहे. मात्र फडणवीसांच्या विधिमंडळातील ऑफरच्या संदर्भात चर्चा झाली असावी, असेही म्हटले जात आहे.

### फडणवीसांचा माईंड गेम

गेल्या काही दिवसापासून दोन्ही ठाकरेंच्या मनोमिलनाची चर्चा असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर या घडामोडीला अनन्य साधारण महत्व होते. ठाकरे एक झाले तर मुंबईसह इतर मोठ्या शहरातील मनपा निवडणुका जिंकणे भाजपसाठी अवघड जाणार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे कुठेतरी ठाकरे बंधु एकत्र येऊ नयेत, यासाठी फडणवीसांचा हा माईंड गेम असल्याचे म्हटले जात आहे.

-------------

## खा.भुमरेंच्या ड्रायव्हरच्या

दिवसांपूर्वी झाला आहे. भूमरे यांचा ड्रायव्हर जावेद शेख मात्र आपल्या जबाबावर ठाम आहे. यावेळी बोलताना शेख म्हणाले की, यात व्यवहार काहीही झालेले नाही. मला काही पैसे मिळाले नाही, मी काही दिले नाही मी काही दोषी नाही. माझे दुर्दैव आहे मी भुमरे साहेबांचा ड्रॉइव्हर असल्याने यात त्यांचे नाव घेतले जात आहे. पण यात त्यांचा काही संबंध नाही, असे शेख यांनी म्हटले आहे. दरम्यान, सालारजंगने हिबानामा करून दिलेल्या १५० कोटींच्या जमिनीबाबत पोलिस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेत खासदार संदिपान भुमरे यांचे चालक जावेद रसूल शेख यांची सातत्याने चौकशी सुरू आहे. ते त्यांच्या जबाबावर ठाम आहेत. त्यामुळे त्यांची पोलिसही पुन्हा चौकशी करीत आहेत. पोलिसांच्या हाती अद्याप कोणताही ठोस पुरावा लागलेला नाही, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणात पुढे काय होणार, याबद्दल उत्सुकता आहे.

----------

## जिल्ह्यातील ३३६ शिक्षक होणार

३३६ शिक्षकांना मान्यता दिली गेल्याने आता हे शिक्षक सेवेमध्ये असतानाच उच्च शिक्षण देखील घेऊ शकतील शैक्षणिक विभागाने आज दिलेल्या या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे तर अनेकांनी शिक्षण अधिकारी यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांची देखील आभार मानले आहेत

-------------

## दीपा मुधोळ-मुंडे आता समाजकल्याण

उल्लेख होता प्रायोगीक तत्वावर बीडची निवड होती त्यातही फार्मर आयडी ही योजना त्यांनी यशस्वी केली त्याच बरोबर गाळ मुक्त धरण आणि गाळ युक्त शेती हे अभियान राबवले होते मात्र लोकसभा निवडणूकीनंतर त्यांची पुणे येथे महापालिका परिवहन विभागाच्या आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आता तेथूनही समाजकल्याण विभागाच्या आयुक्त म्हणून बदलीने नियुक्ती करण्यात आली आहे.

---------------

## ज्ञानेश्वरी मुंडेंची खा.सोनवणेंनी

सोनवणे यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी तुमचा भाऊ म्हणून मी पाठीशी असून तूम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी मी लढा देईल, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला. परळी येथील व्यापारी मुंडे यांचा ऑक्टोबर २०२३ मध्ये निर्घृण खून झाला होता. या घटनेला आता अठरा महिन्यांहून अधिकचा काळ लोटला आहे पण या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक झाली नाही. तपासाला विलंब होत असल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी सकाळी कुटुंबासह बीड पोलीस अधीक्षक कार्यालयापुढे अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी पोलीसांनी रोखले परंतु त्यानंतर त्या गाडीत बसण्यासाठी गेल्या परंतु त्यांनी फ्रुटीच्या बाटलीत असलेले कोणते तरी विषारी द्रव केले आणि त्या जमिनीवर कोसळल्या. यानंतर पोलिसांनी तातडीने त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेले आहे. दि.१७ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईहून परतले. त्यांनी केजला न जाता आधी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली. उपचार सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची त्यांनी भेट घेत अस्तेवाईकपणे चौकशी केली. ताई, तूम्ही आत्महत्या करण्याचा विचार करण्याआधी लेकरांच्या तोंडाकडे बघायचे होते. या लेकरांसाठी खंबिर व्हा, तूम्हाला न्याय देण्यात हे सरकार कमी पडत आहे. परंतु तूमच्या लढाईत मी स्वत: तुमचा भाऊ म्हणून तुमच्या पाठिशी आहे, या लढाईत मी तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून लढेल, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात...



### सिरसवाडी येथील युवकांचा भाजपात प्रवेश

जालना (प्रतिनिधी) भारतीय जनता पक्ष जालना कार्यालयात शिरसवाडी येथील अनेक युवकांनी मा.केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक ढगे, योगेश चांडोल, गणेश झुंबड, ओंकार खंडे, विलास गव्हाड, सार्थक ढगे, प्रेमानंद ढगे, गणेश खंडेकर, विलास ढगे, दिनेश ढगे यांनी भारती जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी श्री. भास्कर आबा दानवे यांनी सर्व नवप्रवेशितांचे मनःपूर्वक स्वागत केले आणि त्यांना पक्षाच्या विचारसरणीत काम करण्याचे आवाहन केले.

### पत्रकारांसाठी रविवारी एक दिवसीय कार्यशाळा

बीड । प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एक दिवसीय कार्यशाळा रविवार, २० जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात होणार आहे. मूळ वर्धा जिल्ह्यातील व सध्या परभणीमध्ये जिजाऊ ज्ञानतीर्थ महाविद्यालयात शिक्षक असलेले दीपक रंगारी 'वृत्तसंकलन-संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व', माध्यम तज्ज्ञ आणि पत्रकारितेची पायवाट आणि संरक्षण पत्रकारिता या ग्रंथांचे लेखक प्रा. शिवशंकर पटवारी 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावर तर 'समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये' यावर छत्रपती संभाजी नगर येथील माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे मार्गदर्शन करणार आहेत. अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी आदी पत्रकारांसाठी असलेल्या योजनांबाबत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके माहिती देणार आहेत. या कार्यशाळेत सर्व पत्रकार बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात आले आहे.



### जनसुरक्षा कायद्याविरोधात विधिज्ञांचे आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यातील जनसुरक्षा कायदा रद्द करावा या मागणीसाठी अंबाजोगाईतील विधिज्ञ आणि वकिलांनी एकत्र येत जोरदार आवाज उठवला. संविधानाच्या विरोधात जाणारे व लोकशाहीला धोका निर्माण करणारे हे विधेयक असून यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येणार आहे, असा ठाम सूर यावेळी उपस्थित वकिलांनी व्यक्त केला. उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन देत या कायद्याला तीव्र विरोध करण्यात आला.

या वेळी विधिज्ञांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जनसुरक्षा कायद्याच्या नावाखाली समाजातील कष्टकरी, वंचित, शोषित तसेच सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, पत्रकार, मानवी हक्क रक्षक यांच्या आंदोलनाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. सरकार स्वतः म्हणते की राज्यातील नक्षलवाद आणि दहशतवाद संपला आहे, मग अशा परिस्थितीत हा कायदा नेमका कोणासाठी? असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.

यावेळी विधिज्ञांनी नमूद केले की, या कायद्यात सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनांवर कारवाईचे अधिकार देण्यात आले असून त्यामार्फत कोणत्याही शाब्दिक किंवा कृतीद्वारे प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. मात्र, या तरतुदीचा सत्ताधाऱ्यांकडून राजकीय विरोधक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकारांना लक्ष्य करण्यासाठी गैरवापर होण्याचा धोका आहे. त्यामुळे जनसुरक्षेच्या नावाखाली नागरिकांच्या हक्कांचे गळचेपी करणारे हे विधेयक तात्काळ रद्द करावे, अशी स्पष्ट मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदन देताना अंबाजोगाईतील मोठ्या संख्येने विधिज्ञ, वकिल मंडळी उपस्थित होते. यावेळी त्यांनी संविधान रक्षणासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धारही व्यक्त केला.

### उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक १९ रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर

बीड : उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.शनिवार, १९ जुलै रोजी छत्रपती संभाजी नगरहून मोटारीने गेवराई येथे दुपारी एक वाजता आगमन. कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कोल्हेर रोड वरील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उपस्थिती. दुपारी ४ वाजता मोटारीने पुसद, जि. यवतमाळकडे प्रयाण

# आता प्रत्येक उपविभागीय कार्यालयात भरोसा सेल

## पैसा आणि शारीरिक श्रम वाचण्यासाठी ही सुविधा -पोलीस अधीक्षक नवनीत कावत

**बीड । प्रतिनिधी**

**महिला, बालक, ज्येष्ठ नागरिक आणि समाजातील दुर्बल घटकावरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि त्यांना त्वरित मदत मिळावी पैशाचा अपव्यय टाळावा या दृष्टिकोनातून प्रत्येक उपविभागीय कार्यालयात आता स्थापना करण्यात आली असून या ठिकाणी कार्यरत भरोसा सेलवर जिल्हा भरोसा सेलचे थेट नियंत्रण राहणार आहे. याशिवाय उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचेही यांच्यावर थेट नियंत्रण राहणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांचा पैसा आणि श्रम वाचविण्यासाठी या सेलची स्थापना करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दिली.**

जिल्ह्यातील महिला बालक ज्येष्ठ नागरिक आणि समाजातील दुर्बल घटकावरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी त्यांना त्वरित मदत देण्यासाठी आणि त्यांचे समुपदेशन करून कायदेशीर व मानसिक आधार प्रदान करण्यासाठी पोलीस दलाच्या वतीने भरोसा सेल तयार करण्यात आला .आता हा सेल उपविभागीय स्तरावरही विस्तारित करण्यात आला असून या ठिकाणी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे. कौटुंबिक वाद, लैंगिक अत्याचार ,मानसिक त्रास, घरगुती हिंसाचार यासारख्या संवेदनशील प्रकरणांमध्ये विविध व्यक्तींना मानवी दृष्टिकोनातून त्वरित मदत व सल्ला देणे



हे भरोसा सेलचे काम आहे. या सेलमध्ये प्रशिक्षित पोलिस आमलदार, महिला कर्मचारी, समुपदेशक ,सामाजिक कार्यकर्ते व गरजेनुसार वैद्यकीय सल्लागार यांचा समावेश असतो. याद्वारे पीडित व्यक्तींना संरक्षण, न्याय आणि मानसिक आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. पूर्वी हा सेल जिल्हास्तरावर असल्याने सीमा लगतच्या भागातील नागरिकांना अडचण होत होती. यासाठी पैसा आणि वेळ दोन्ही खर्च करावा लागत होता. यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी आता भरोसा सेलची प्रत्येक उपविभागीय स्तरावर स्थापना केली आहे. यासाठी बीड जिल्हा भरोसा सेलमध्ये प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक शालिनी गजभरे याच कायम असुन अंबाजोगाई येथे शहर पोलीस ठाण्याचे एस. पी. कराड, अंबाजोगाई ग्रामीणचे पी.ए. वाघमारे, आष्टी येथे अमळनेर पोलीस ठाण्याचे ए. पी. शिंदे अंभोरा पोलीस ठाण्याचे एस.डी. खरमाटे, माजलगाव येथे शिरसाळा पोलीस ठाण्याचे एस.ए. चव्हाण ,गेवराई येथे चकलांबा पोलीस ठाण्याचे डी.वी. गुरसाळे, तलवाडा पोलीस ठाण्याचे आर.सी. माने तर केज येथे केज पोलीस ठाण्याच्या सीमा निरडे व युसुफ वडगाव पोलीस ठाण्याच्या सखु गीते यांची नियुक्ती केली आहे. या अधिकाऱ्यांवर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे तसेच जिल्हा भरोसा सेल चे नियंत्रण राहणार आहे. जेणेकरून नागरिकांना विश्वास पूर्ण सेवा मिळेल. तसेच जिल्हास्तरावर जिल्हा व बीड तालुका स्तरावर एकच भरोसा सेल राहणार असून जिल्ह्यातील लोकांना न्याय देण्याचे काम याद्वारे करण्यात येईल. तसेच नागरिकांचा पैसा आणि वेळ वाचेल असेही पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे.



### महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा जालना दौरा

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर (राज्यमंत्री दर्जा) या शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता जालना येथील शासकीय विश्रामगृहात आगमन व राखीव. सायंकाळी ५ वाजता जालना येथील वन स्टॉप सेंटरला भेट व आढावा बैठकीस उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता जालना येथून हिंगोलीकडे प्रयाण करतील.

### बीड-जालना माध्यमिक शिक्षण विभागातील रिक्त जागा भराव्यात - शिक्षक संघाचे निवेदन!



जालना । प्रतिनिधी

बीड व जालना माध्यमिक शिक्षण विभागातील रिक्त जागांमुळे शिक्षकांची अनेक कामे खोळंबून पडली आहेत. त्यामुळे शिक्षकांमधे प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली आहे. त्याची दखल घेऊन या दोन्ही जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील रिक्त जागा ताबडतोब भराव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम व छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांनी शिक्षण उपसंचालक मा. प्रकाश मुकुंद साहेब, शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले. बीड व जालना माध्यमिक शिक्षण विभागात अनेक जागा रिक्त असल्याची बाब निदर्शनास आणली. या दोन्ही जिल्ह्यातील सेवानिवृत्ती विभागात कर्मचारी नाही. त्यामुळे सेवानिवृत्त प्रस्ताव पाठविणे व मंजूर होवून आलेल्या सेवानिवृत्ती प्रस्तावावर पुढील कार्यवाही होण्यास विलंब होत आहे परिणामी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले व सेवानिवृत्त झालेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी अडचणीत आले आहेत. बीड येथे लिपिकाचे पद रिक्त असल्याने सर्व कार्यालयीन कामकाज ठप्प झाले आहे. जालना माध्यमिक शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी व अधिक्षक ही पदे रिक्त असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. या दोन्ही जिल्ह्यातील वेतन पथक कार्यालयातही जागा रिक्त असल्याचे शिक्षण उपसंचालक साहेब यांच्या निदर्शनास आणून दिले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असल्याने कामाचा खोळंबा वाढला आहे. परिणामी शिक्षकांमधे प्रचंड असंतोष व चिड निर्माण झालेली आहे. याची ताबडतोब दखल घेऊन या रिक्त जागा भराव्यात अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे.

### अहो आश्चर्यम! नारळाच्या झाडाला फुटल्या दोन फांद्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

निसर्गाची करणी अन नारळात पाणी ! या निसर्गाच्या जडणघडणीत कधी काय चमत्कार होईल हे सांगता येत नाही. असाच एक चमत्कार मोदी लर्निंग सेंटरमध्ये शेकडो नारळाच्या झाडात एकच नारळाचे झाड आपले वेगळेपण दाखवत आहे. आजपर्यंत शेकडो नारळाच्या बागा आढळतात त्यात हजारो सरळ सोट नारळाचे झाडेही दिसून येतात. मात्र हजारो झाडातून एकच दोन दोन फांद्याचे झाड असे आढळून येते.



असेच दोन फांद्याचे नारळाचे दुर्मिळ असे एक झाड अंबाजोगाई शहरातील मोदी लर्निंग सेंटर येथे आपले वेगळेपण जपत उभा असल्याचे दिसून येत आहे. असेच हे दुर्मिळ दोन फांद्याचे नारळाचे झाड पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी दिसून येत आहे. हे झाड मोदी लर्निंग सेंटरचे संस्थापक राजकिशोर मोदी, संकेत मोदी हे देखील मोठ्या अपूलकीने जपत आहेत. नारळाच्या झाडाला हिंदू धर्मात अतिशय अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. हिंदू देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी देवाला नारळ अर्पण करण्याची प्रथा अनादी काळापासून प्रचलित आहे. नारळाचे हे झाड उंच गगनाला भिडत असल्याचे आपण पहात आलो आहोत. पण नारळाच्या झाडाला फांदी फुटल्याचे आपणास ऐकिवात नाही किंवा पाहण्यात नाही. पण असेच दोन फांद्या फुटलेले नारळाचे झाड अंबाजोगाई शहरात चर्चेचा विषय ठरले जात आहे.

### सोमवारी ह.भ.प सुधाकर महाराज शिंदे यांची प्रवचन सेवा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवासस्थानी



प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होणार असून,

या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २१/७/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत बीड येथील राजर्षी शाहू विद्यालयाचे निवृत्त मुख्याध्याप श्री.ह.भ.प.सुधाकर महाराज शिंदे याची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून,

या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे....

## पान ६ वरून...

**अमोलकमध्ये पंजाबराव डख**

भेट मिळणार आहेत. तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी प्रसिद्ध हवामान तज्ञ श्री पंजाबराव डख यांचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. या मार्गदर्शनाचा तालुक्यातील सर्व शेतकरी बंधूंनी लाभ घ्यावा असे आव्हान श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळातर्फे करण्यात आले आहे.

**तहसीलदार चंद्रकांत शेळके**

शेतकऱ्यांची कामे लवकर झाली पाहिजे, फेरफार लवकर झाले पाहिजे , फार्मर आयडी लवकर निघाले पाहिजे यासाठी त्या वेळोवेळी बीड , गेवराई , शिरूर कासारचे तहसीलदार , नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी यांचा पाठपुरावा करत असतात. आजच्या तहसीलदारांच्या भेटीमुळे पोथरा येथील शेतकरी आनंदी झाल्याचे दिसून आले . माझ्या शेतात तहसीलदार यांनी स्वतः येऊन कोळपणी केली हे माझे भाग्य आहे, असे दराडे यांनी नमूद केले . बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याप्रमाणे क्षेत्रिय भेटी दिल्या , शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या तर निश्चितच प्रशासनाबद्दलची नागरिकांची भावना सकारात्मक होईल यात शंका नाही .

**नारायण गडाची बदनामी**

आहे व कोण जाणीवपूर्वक बदनामी करत आहे व यामागे कोणाचा हात आहे हे मी लवकरच बाहेर काढणार आहे यापुढे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्ष आपल्या सेवेसाठी तत्पर राहिन असे अभिवचन देतो . बाबा आपल्या गडाच्या पाठीशी लाखो भाविक भक्त आहेत, बदनामी करणारे लवकर उघडे पडतील व भक्त त्यांना माफ करणार नाहीत असे वरेकर यांनी सांगितले. यावेळी समवेत अँड. योगेश शेळके ,जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी सरपंच सखाराम तात्या मोहिते हे उपस्थित होते.

**गेवराईत बंजारा मेळाव्याची**

आदरनिय ना.इंद्रनीलभाऊ मनोहरराव नाईक व मुख्य अतिथी म्हणून राज्याचे कणखर व लोकप्रिय मुख्यमंत्री आदरनिय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे विश्वासू सहकारी तथा मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे राज्य प्रमुख आदरनिय रामेश्वरभाऊ नाईक हे उपस्थित राहणार असून

दोन्ही मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन बंजारा समाज बांधवांना लाभणार असून एक प्रकारे सामाजिक व राजकीय विचार मांडताना दोघांची धडाडणार आहे. शनिवार दिनांक १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालय,कोल्हेर रोड गेवराई येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाला गेवराई विधानसभेचे अभ्यासू आमदार विजयसिंह पंडित,ना.इंद्रनील भाऊ नाईक यांच्या सुविद्य पत्नी तथा नाईक फाउंडेशन पुसदच्या अध्यक्ष आदरनिय अँड.मोहिनी ताई यांना व विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या इतर मान्यवरांना सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात आले आहे. यावेळी सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाज बांधवांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. बंजारा समाजाच्या या भव्यदिव्य कार्यक्रमाला गेवराई तालुका सह जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहून बंजारा समाजाची संघटित ताकद दाखवून द्यावी, असे आवाहन महानायक वसंतरावजी नाईक जयंती उत्सव समितीचे मुख्य पदाधिकारी उत्तमभाऊ चव्हाण प्रा.पी.टी.चव्हाण,बाबुराव जाधव,अण्णासाहेब राठोड, राजेश पवार,सतीश पवार व अनिल राठोड यांनी केले आहे .

**अवैद्य गुटखा विक्री करणारांवर**

घेवुन त्यास दिनांक १६ जुलै बुधवार रोजी न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्यास जिल्हा कारागृह बीड येथे दाखल करण्यात आले आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव शहर, पोउपनि/के.बी. माकणे, पो.शि.२२९९ थापडे, यांनी केली आहे.

**अरण तीर्थक्षेत्रासाठी**

रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.गेल्यावर्षी सावता महाराजांच्या समाधी सोहळ्यादरम्यान माळी समाजाने केलेले प्रभावी शक्ती प्रदर्शन व समाजबांधवांचा मोठा सहभाग पाहून फडणवीस यांनी अरण तीर्थक्षेत्राच्या सर्व मागण्यांना मान्यता देत तीर्थक्षेत्र विकासाचा मार्ग मोकळा केला.हे यश संपूर्ण माळी समाजाचे आहे! या निधीमुळे श्री क्षेत्र अरणच्या सर्वांगीण विकासाला आता नवे रूप मिळणार असल्याचे एड.सतीश शिंदे यांनी म्हटले आहे.

**अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना**

एसटीच्या सर्व बसेस मधून मोफत प्रवास करण्याची सवलत अनुज्ञेय करावी अशी मागणी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत ९ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत केली होती. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले असल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. या मागणीबाबत सकारात्मक प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांना एसटी प्रवासासाठी सद्या ऑनलाइन आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध नाही. येत्या १५ ऑगस्टपासून ऑनलाइन सीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना पुढील महिन्यापासून घरबसल्या एसटी बसमधून प्रवास करण्यासाठी सीट आरक्षित करता येईल. या निर्णयांमुळे पत्रकारांना काम करताना अधिक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगत मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री सरनाईक यांचे आभार मानले.

### जाहिर प्रगटन

परतूर येथील तालूका दंडाधिकारी परतूर यांचे न्यायालयात
अर्ज क्रमांक ३०४/२५
अर्जदार : अश्विनी भारत राहेकर
विरुद्ध गैरअर्जदार : ग्रामसेवक तालुका परतुर.

प्रकरण - जन्म मृत्यू नोंदणी नोंदयो (सुधारणा) अधिनियम २०२३ अन्वये कलम १३(३) प्रमाणे अर्ज ज्या अर्थी अर्जदार नामे अश्विनी भारत राहे कर वय वर्ष २८ धंदा - शिक्षण ता. परतुर जि. जालना यांनी अर्जात नमूद केल्यानुसार अर्जदार स्वतः जन्मदिनांक : ७/७/२००१ रोजी मोजे खांडवी वाडी तालुका परतुर जिल्हा जालना येथे झालेला आहे. त्याच्या जन्माची नोंद नगरपरिषद/ग्रामपंचायत कार्यालय येथे घेऊन तसेच द्यावे जन्माचे प्रमाणपत्र दयावे यासाठी या न्यायालयात अॅड............. अर्ज केला आहे. यांच्या मार्फत अर्ज या जन्माच्या नोंदीबाबत कोणाचाही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी उक्त न्यायालयात त्याबाबत लेखी आक्षेप सादर करावे. पू.ता.दि.

आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्यानिशी दिले.

**नायब तहसिलदार परतुर जि.जालना**

# ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त अंबाजोगाईत दिनांक १६ ते २२ जुलै दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य सवाद्य मिरवणूक, आतिषबाजी, भाविक भक्तांच्या जयघोषात सप्ताहास सुरूवात झाली.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील संत सावतामाळी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज रोड, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी आयोजित श्री संत सावता महाराज महात्म्य कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ बुधवार, दिनांक १६ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता जिरे गल्ली येथून ग्रंथ दिंडीने झाला, सवाद्य मिरवणूक, आकर्षक पालखी सजवून, भगव्या पताका खांद्यावर घेऊन, टाळ-मृदंग-वीणा घेऊन विठोबा- रखुमाई, ज्ञानदेव-तुकाराम नामाचा गजर करीत लहान मुले व मुली विठ्ठल-रखुमाई, विविध संत यांची वेशभूषा करून तर महिला भगिनी यांनी कलश सजवून, तुळशी वृंदावन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिक, युवक हिरीरीने सहभागी झाले होते. त्यानंतर सकाळी आकरा वाजता कलश पूजन व टाळ-वीणा-मृदंग पूजन हस्ते ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर, ज्येष्ठ समाजसेवक



ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य मिरवणूकीने लक्ष वेधले

नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, आनंद शंकरराव शिंदे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, मूदंगाचार्य ह.भ.प.गणेश आढाव, ह.भ.प.ऋषि महाराज मोरवडकर, ह.भ.प.दिपक महाराज कोरडे, गायनाचार्य ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, भजनी मंडळ : श्री मुकुंदराज गुरूकुलचे सर्व विद्यार्थी (मुकुंदराज स्वामी मंदिर,अंबाजोगाई) हे होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. तर सुत्रसंचालन राम घोडके यांनी केले. या सप्ताहाची सांगता बुधवार, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत होवून त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहाचे आयोजनासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश घोडके, उपाध्यक्ष सुरेश बलुतकर, अनंत अरसुडे, सचिव अर्जुन वाघमारे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष संतोष राऊत, राम घोडके, सदस्य सर्वश्री बळीराम चोपणे, प्रकाश बलुतकर, लक्ष्मण पाथरकर, मधुकर जिरे, नामदेव माळी, दत्तात्रय घोडके, रमेश जिरे, बबन घोडके, दशरथ जिरे, बालासाहेब मसने, अशोक बलुतकर, बालासाहेब माळी, प्रदीप जिरे, विष्णु राऊत, सुभाष चोपणे, डॉ.सुरेश अरसुडे, डॉ.दिपक फुटाणे, बालासाहेब चोपणे, विठ्ठल शिंदे, रमेश घोडके, सिद्राम घोडके, मधुकर घोडके, अशोक जिरे, तुषार करपुडे, बालासाहेब घोडके, संतोष जिरे, गोविंद पाथरकर, पवन जिरे, योगेश डाके, महेश सपाटे, आशिष आढाव, अभिजीत जिरे, शरद माळी, तुकाराम माळी, मंगेश बलुतकर, नितीन जिरे, दिपक गिरे, बबनराव जाधव, पंकज राऊत यांनी तसेच संयोजक, समस्त माळी समाज अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला आहे.

# कांद्याचे धोरण ठरवण्यासाठी नवीन समिती

## पाशा पटेल अध्यक्ष, एक महिन्यात होणार अहवाल सादर



मुंबई : भारतामध्ये आणि त्यातल्या त्यात महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड केली जाते. त्यातली त्यात देशातील एकूण कांदा उत्पादनापैकी तब्बल ५० टक्के कांदा उत्पादन महाराष्ट्रामध्ये होते. परंतु कांद्याचे दर जर पाहिले तर कायम शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टिकोनातून अडचणीत आणतात व बऱ्याचदा शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नाही. यामध्ये बऱ्याचदा केंद्र सरकारची धोरणे कारणीभूत ठरतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारकडून कांदा उत्पादनाच्या बाबतीत योग्य ते धोरण ठरवणे खूप गरजेचे आहे व त्या पद्धतीची मागणी शेतकऱ्यांच्या माध्यमातून कायम होत असते.

या अनुषंगाने आता राज्य सरकारने कांदा धोरण ठरवण्यासाठी पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. एक महिन्याच्या मुदतीमध्ये त्यांना याबाबतचा अहवाल सादर करायचा आहे, अशी माहिती समोर आलेली आहे. परंतु सध्या विधानसभेच्या अधिवेशन चालू असताना मात्र विधान परिषदेतील आमदार सत्यजित तांबे यांनी नियम ९३ अन्वये सूचनेच्या माध्यमातून सरकारला १८ डिसेंबर २००२ मध्ये तत्कालीन पणनमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात आली होती. त्याबद्दल महत्त्वाचा प्रश्न विचारला व त्या प्रश्नाला उत्तर देताना पणनमंत्री जयकुमार गोरे यांनी मागील समितीबाबत आणि आत्ताच्या समितीचा उद्देश काय याबद्दल माहिती दिली.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या ज्या काही समस्या आहेत त्या समस्या सोडवता याव्यात याकरिता १८ डिसेंबर २००२ ला तेव्हाचे पणनमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळाच्या दोन्ही सभागृह सदस्यांची एक संयुक्त समिती नेमली होती व त्यामध्ये रामराजे नाईक निंबाळकर तसेच प्रशांत हिरे, अनिल अहिर तसेच पोपटराव गावडे, माणिकराव कोकाटे, कल्याणराव पाटील, एकनाथ खडसे आणि दौलतराव आहेर या सदस्यांचा समावेश होता. या समितीने अहवाल देखील सादर केलेला होता. परंतु नंतर त्यांनी सादर केलेल्या अहवालाचे नेमके काय झाले? असा महत्त्वाचा प्रश्न विधान परिषदेतील आमदार सत्यजित तांबे यांनी सरकारला केला.

जर या अहवालाच्या अंमलबजावणी झाली असती तर आज कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी नवे धोरण ठरवण्यासाठी नवीन समिती नेमण्याची वेळ आली नसती. त्यावर उत्तर देताना मंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले की कांदा हे महत्त्वाचे नगदी पीक असून भारताच्या कांदा निर्यातीत महाराष्ट्राचा ४० टक्के वाटा असून कांद्याला पूर्वी ४०% निर्यात शुल्क लावण्यात येत होते. त्यामध्ये राज्य सरकारने बरेच प्रयत्न केले व हे शुल्क २० टक्क्यांवर आणले व आता ते शून्य टक्क्यांवर आणले गेले आहे. तसेच नाफेड आणि एनसीसीएफला तब्बल तीन लाख मॅट्रिक टन कांदा खरेदी करण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. तामिळनाडू, पश्चिम बंगाल किंवा इतर राज्यांनी कांदा इथे येऊन खरेदी करावा असा देखील सूचना दिल्या असल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या दररोज बाजारपेठेची परिस्थिती बदलते व त्यामुळे अनेक मार्केट आता आले असून या पार्श्वभूमीवर आता नवीन कांदा धोरण ठरवण्यासाठी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असल्याचे त्यांनी म्हटले.

# उसावरील लालकूज नियंत्रण



उसावरील लाल कुज हा बुरशीजन्य रोग महाराष्ट्रात कमी प्रमाणात सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत नव्यानेच आढळलेला होता. सध्या या रोगाचा प्रादुर्भाव राज्यात ऊस पिकामध्ये दिसून येत नसला, तरी हा रोग अतिशय महत्त्वाचा आहे. या रोगामुळे अनुकूल परिस्थितीत ऊस पिकाचे १०० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. या रोगामुळे ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तसेच रसाची शुद्धता आणि साखर उतारा यामध्ये जास्त घट संभवते. रोगाची लक्षणे पिकाच्या पानांवर तसेच कांड्यावरती दिसून येतात.

रोगकारक बुरशी : कोलेटोट्रिकम फालकॅट्म

प्रसार : ऊस बेणेद्वारे होतो. या रोगास उसाचा कर्करोग असेही म्हणतात.

पानावरील लक्षणे : सुरुवातीस पानाच्या शिरेवर वरील बाजूस लालसर रंगाचे २ ते ३ मिमी लांबीचे आणि ०.५ मिमी रुंदीचे ठिपके आढळतात. कालांतराने ठिपक्यांची लांबी वाढत जाते. त्यानंतर पाने वाळतात. रोगाची तीव्रता वाढल्यावर शेंड्याकडील सर्व पाने वाळतात. कांड्यावरील लक्षणे : रोगट उसाची पाने वाळल्यानंतर कांड्यावर तपकिरी किंवा लालसर तपकिरी पट्टे आढळतात. कांड्या सुकतात आणि आकसून जातात. रोगग्रस्त उसाच्या कांड्याच्या आतील भाग पाहिल्यास, त्यावर लाल रंगाचे अनियमित आकाराचे ठिपके किंवा पट्टे आढळतात. कांड्यांच्या आतील भाग पोकळ होऊन त्यामध्ये कापसासारखी आणि करड्या रंगाची बुरशीची वाढ आढळून येते. कांड्याच्या आतील भागाचा वास अल्कोहोलसारखा येतो. रोगाची तीव्रता वाढल्यावर आकसलेल्या कांड्यावर काळ्या रंगाच्या असेरुलाई तयार होतात. रोगग्रस्त उसाची बेटे निस्तेज होऊन वाळतात.

नियंत्रण : मळ्यातील बेणे लागणीकरिता वापरावे. लागणीपूर्वी ऊस बेण्यास कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे १५ मिनिटे प्रक्रिया करावी. लागण केलेल्या जमिनीत पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी. रोगट बेटे खणून काढावीत व त्या ठिकाणी कार्बेन्डाझिम किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २ ग्रॅम प्रति लिटर पाणी यापैकी एका बुरशीनाशकाचे द्रावण करून आळवणी करावी. तसेच ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैवबुरशीनाशकाचा वापर करावा.

रेड रॉट झालेल्या उसाचा खोडवा न घेता त्या शेतात द्विदल धान्याचे पीक घेऊन फेरपालट करावी. पानावर रोगाची लक्षणे आढळल्यानंतर, कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने स्टीकर वापरून २ ते ३ फवारण्या कराव्यात.

# पशुपालनासाठी वापरण्यात येणाऱ्या काही औषधांवर केंद्र सरकारने घातली बंदी



दिल्ली / वृत्तसंस्था

केंद्र सरकारने पशुच्या वाढीसाठी वापरण्यात येणाऱ्या १८ अँटीबायोटिक्स, १८ अँटीव्हायरल आणि एक अँटी-प्रोटोझोआनवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने तशी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

अंडी देणारे पक्षी, दुभते प्राणी, मधमाश्या, गाय, म्हशी, शेळी, मेंढी आणि डुक्कर यांच्या उत्पादनातील वाढीसाठी अँटिमायक्रोबियलच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. तसेच आतडे वापरून तयार करण्यात येणाऱ्या उत्पादन प्रक्रियांमध्ये त्याचा वापर करता येणार नाही, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने अधिसूचनेत म्हटले आहे. पशुपालनातील उत्पादन वाढवण्यासाठी विविध अँटिमायक्रोबियलचा वापर केला जातो. त्यामुळे या औषधांचे अवशेष अन्नसाखळीच्या माध्यमातून मानवी आहारात येतात. त्यातून मानवी आरोग्याचे गंभीर परिणाम होतात. त्यामुळे या १८ अँटीबायोटिक्स, १८ अँटीव्हायरल आणि एक अँटी-प्रोटोझोआन बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. परंतु मंत्रालयाने या औषधांची यादी अद्याप प्रसिद्ध केली नाही.

# जनावरांसाठी चाटण विटा घेताना या बाबी तपासा




शेतकरी बंधुनो, चाटण विटा जनावरांच्या पोषणासाठी महत्वाच्या असतात. पण चुकीची विट खरेदी केली तर आरोग्याचा आणि पैशाचा दोन्ही तोटा होऊ शकतो. म्हणूनच खरेदी करताना काही बाबी तपासच्याची गरज आहे.

चाटण विटा घेताना अशी घ्या काळजी : ब्रँड व कंपनीचा दर्जा पाहा, प्रमाणित उत्पादकांची निवड करा, कॅल्शियम, फॉस्फरस, मिठ, झिंक, कॉपर, सेलेनियम यांचे प्रमाण योग्य आहे का ते पहा. जनावरांच्या वयोगटानुसार निवड वासरं, दुधाळ जनावरे, गाभण जनावरे यांच्यासाठी वेगवेगळ्या विटा उपलब्ध आहेत. आकर्षक रंगांवर न जाऊन गुणवत्ता पहा. काही विटा रासायनिक रंगांनी रंगवल्या जातात याकडे लक्षा द्या. पॅकिंग व लेबलिंग तपासा, उत्पादनाची तारीख, एक्सपायरी डेट आणि साहित्याची यादी पहा. किंमत आणि वजनाचा तुलनात्मक विचार करा, जास्त वजन आणि योग्य किंमत असलेली विट घेणे फायद्याचे. पशुवैद्यकांचा सल्ला घ्या, जनावरांच्या स्थितीनुसार कोणती विट योग्य आहे हे जाणून घ्या. स्थानिक हवामान विचारात घ्या. काही ठिकाणी विशिष्ट खनिजांची कमतरता जास्त असते. ओलसरपणा टाळा आणि विटा कोरड्या ठिकाणी ठेवलेल्या असतील याची खात्री करा. जनावरांची आवड तपासा, काही जनावरे विशिष्ट प्रकारच्या चव असलेल्या विटा जास्त चाटतात.

डुप्लिकेट प्रोडक्टपासून सावध रहा. फसवे ब्रँड्स टाळा आणि नेहमी अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करा.




### महत्वाच्या घटना

६४ई.पुर्व : रोममध्ये भीषण आग लागुन जवळजवळ सगळे शहर भस्मसात झाले. यादरम्यान सम्राट निरो लांब उभा राहुन आपले फिडल (तुणतुणे) वाजवत असल्याची कथा प्रसिद्ध आहे.

१८५२ : इंग्लंडमधे निवडणुकांत गुप्त मतदान वापरण्यास सुरूवात झाली.

१८५७ : मुंबई विद्यापीठाची स्थापना

१८७२ : ब्रिटन मध्ये निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा अधिनियम लागू करण्यात आला. यापूर्वी खुल्या प्रकारे मतदान केलं जात असे.

१९१४ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिका सोडले.

१९२५ : अ‍ॅडॉल्फ हिटलरने 'माइन काम्फ' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रकाशित केले.

१९६८ : सांता क्लारा, कॅलिफोर्निया येथे 'इंटेल'कंपनीची स्थापना

१९७६ : मॉन्ट्रिअल ऑलिंपिक खेळात नादिया कोमानेसीने जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत सर्वप्रथम १० पैकी १० गुण मिळवले.

१९८० : भारताने 'एस. एल. व्ही. ३' या अवकाशयानाद्वारे रोहिणी-१ या उपग्रहाचे अंतराळात यशस्वी प्रक्षेपण केले. या यशामुळे भारत हा उपग्रह सोडण्याची क्षमता असलेला जगातील सहावा देश बनला.

१९९६ : 'तामिळ टायगर्स'नी श्रीलंकेचा सैनिक तळ ताब्यात घेऊन सुमारे १२०० जवानांना ठार केले.

१९९६ : उद्योगपती गोदरेज यांना जपान सरकारतर्फे 'ऑर्डर ऑफ द रायझिंग सन' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३५ : रॉबर्ट हूक इंग्लिश वैज्ञानिक (मृत्यू: ३ मार्च १७०३)

१८४८ : डब्ल्यू. जी. ग्रेस इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: २३ आक्टोबर १९१५)

१८४८ : इंग्लिश क्रिकेटपटू डब्ल्यू. जी. ग्रेस यांचा जन्म. (मृत्यू: २३ ऑक्टोबर १९१५)

१९०९ : भारतीय कवी, समीक्षक आणि शैक्षणिक बिश्नु डे यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १९८३)

१९१० : भारतीय उद्योजिका दप्तेंद प्रमानिक यांचा जन्म. (मृत्यू: १५ डिसेंबर १९८९)

१९१८ : नेल्सन मंडेला तथा 'मदीबा' दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ६ डिसेंबर २०१३)

१९२७ : 'गझलसम्राट' मेहदी हसन पाकिस्तानी गझलगायक (मृत्यू: १३ जून २०१२)

१९३५ : जयेन्द्र सरस्वती ६९ वे शंकराचार्य

१९५० : व्हर्जिन ग्रुपचे स्थापक रिचर्ड ब्रॅन्सन यांचा जन्म.

१९७१ : भारतीय गायक-गीतकार आणि अभिनेता सुखविंदर सिंग यांचा जन्म.

१९७२ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (मृत्यू: १७ एप्रिल २००४)

१९८२ : प्रियांका चोप्रा मॉडेल, अभिनेत्री, गायिका आणि 'मिस वर्ल्ड २०००' विजेती

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१७ : इंग्लिश लेखिका जेन ऑस्टीन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७५)

१८९२ : थॉमस कूक पर्यटन व्यवस्थापक (जन्म: २२ नोव्हेंबर १८०८)

१९६९ : 'लोकशाहीर' अण्णाभाऊ साठे लेखक, कवी व समाजसुधारक (जन्म: १ ऑगस्ट १९२०)

१९८९ : डॉ. गोविन्द केशव भट भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे संचालक, मराठी, संस्कृत व इंग्रजी लेखक (जन्म: )

१९९४ : डॉ. मुनीस रझा ख्यातनाम शिक्षणतज्ञ, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म:)

२००१ : पद्मिनीराजे माधवराव पटवर्धन सांगलीच्या राजमाता (जन्म:)

२००१ : रॉय गिलख्रिस्ट कसोटी क्रिकेटमधील भेदक वेगवान गोलंदाज म्हणून कारकीर्द गाजवलेले वेस्ट इंडीजचे वादग्रस्त कसोटीपटू (जन्म: २८ जून १९३४)

२०१२ : राजेश खन्ना चित्रपट अभिनेते, निर्माते आणि लोकसभा सदस्य (जन्म: २९ डिसेंबर १९४२)

२०१३ : भारतीय कवी, गीतकार, आणि अभिनेते वाली यांचे निधन. (जन्म: २९ ऑक्टोबर १९३१)

२०१७ : सुप्रसिद्ध भारतीय कवी, संस्कारकार, कथाकार, उपन्यासकार आणि सहृदय समीक्षक अजित शंकर चौधरी यांचे निधन.

# फवारणी करताना काळजी घेण्याबाबात कृषी विभागाने दिल्या मार्गदर्शक सूचना

पुणे : खरीप हंगामामधील विविध पिकांची लागवड झालेली असून त्यातल्या त्यात कापूस आणि सोयाबीन सारख्या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर असते. ही खरीप हंगामातील दोन्ही महत्त्वाचे पिके असून या पिकांवर मोठ्या प्रमाणावर कीड व रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. अशाप्रकारे रोग आणि किडींच्या नियंत्रणासाठी विविध प्रकारचे कीटकनाशक व गवताच्या नियंत्रणासाठी तणनाशक फवारले जाते. परंतु आपल्याला माहित आहे की बऱ्याचदा शेतकरी बंधू कडून फवारणी करताना आवश्यक ती काळजी घेतली जात नाही व त्यामुळे विषबाधा होऊ शकते व कधी कधी जीवावर देखील बेतण्याची शक्यता वाढते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काही काळजी घेणे खूप गरजेचे असते व याकरिता कृषी विभागाच्या माध्यमातून काही महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना शेतकऱ्यांसाठी देण्यात आल्या आहेत.

फवारणी करताना अशी घ्या काळजी : सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा तुम्ही कीटकनाशकांचे मिश्रण बनवतात तेव्हा ते लाकडी काडीने व्यवस्थित मिसळून घ्यावे व हातमोजे तसेच रबरी बूट, मास्क आणि चष्म्याचा वापर करावा. फवारणी करताना जर औषध अंगावर उडाले असेल तर लगेच साबण किंवा पाण्याने तो भाग स्वच्छ धुऊन घ्यावा. बऱ्याचदा फवारणी करताना नळी किंवा नोझेलमध्ये घाण अडकते. अशी घाण साफ करण्यासाठी टाचणी किंवा तारेचा वापर करावा. फवारणी झाल्यानंतर लगेच आंघोळ करणे गरजेचे आहे व कपडे देखील स्वच्छ धुऊन टाकावेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे फवारणी करताना वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये. नाहीतर फवारणी करताना फवारे हे अंगावर उडण्याची शक्यता वाढते. तसेच कीटकनाशकांचे रिकामे डबे किंवा बाटल्या स्वच्छ करून शेतामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी त्यांचा वापर करू नये. तसेच फवारणी करत असताना ती उपाशीपोटी करू नये. तसेच फवारणी करत असताना तंबाखू किंवा इतर धुम्रपान करणे टाळावे व अन्नपदार्थ देखील खाऊ नये. उरलेले औषध किंवा रिकामे डबे उघड्यावर टाकू नका.

चुकून विषबाधा झाली तर : समजा दुर्दैवाने चुकून विषबाधा झालीस तर तातडीने जवळच्या शासकीय दवाखान्यात जावे किंवा १०८ टोल फ्री क्रमांकावर ॲम्बुलन्स मागवावी. रुग्णाला जितक्या लवकर शक्य होईल तितक्या लवकर डॉक्टरांकडे जाण्याचा प्रयत्न करावा. रुग्णाच्या अंगावर असलेल्या औषधाचे डाग तसेच ओले झालेले कपडे ताबडतोब बदलून ते स्वच्छ पाण्याने धुवावेत.कीटकनाशकांच्या पॅकिंगवरील रंगीबेरंगी पट्ट्यांचा अर्थ काय? कीटकनाशक किंवा तणनाशकांच्या डब्यांवर काही रंगीत पट्ट्या असतात. या पट्ट्यांचा अर्थ जर बघितला तर संबंधित कीटकनाशक किती विषारी आहे किंवा त्यामध्ये विषाची तीव्रता किती आहे हे आपल्याला सांगितले जात असते. यामध्ये लाल रंगाची पट्टी जर असेल तर ते कीटकनाशक अत्यंत विषारी वर्गात येते. निळी पट्टी असेल तर कमी विषयाची तीव्रता व हिरवी पट्टे असेल तर ते सौम्य विषारी असल्याचे दर्शवले जाते.



# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानची सचिवपदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगावची सचिव पदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती सोपवण्यात आले आहेत. त्यांची निवड व अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून संस्थांवर भव्य किर्तन सोहळा संपन्न झाला. सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुंदर किर्तन झाले या कार्यक्रमाला महंत महादेवानंद भारती महाराज,श्री ह भ प महंत प्रकाश महाराज बोधले, श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प महंत जनार्दन महाराज शिंदे, श्री महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी, वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे बापू , महंत धर्मराज महाराज सामनगावकर, ताल मार्तंड केशव महाराज जगदाळे गुरुजी,श्री ह भ प भक्तीदास महाराज शिंदे,भागवताचार्य प्रेमानंद महाराज नगरकर , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प नवनाथ महाराज नाईकवाडे, श्री ह भ प अंगद महाराज सातपुते, रंजीत महाराज शिंदे यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार गायक वादक मंडळी व हजारो भाविक उपस्थित होते..

लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे महान तपोनिधी साधू श्री १००८ ईश्वर भारती महाराज यांच्या परंपरेचे रत्न महंत तुकाराम महाराज भारती यांच्याकडे संस्थांच्या सचिव पदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील सर्व भाविक मंडळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन संपन्न झाले, त्यानंतर अभिष्टचिंतन सोहळ्याला सुरुवात झाली, सुरुवातीला पेढे तुला करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महंत तुकाराम महाराज भारती यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी महादेवानंद भारती यांचाही सत्कार करण्यात आला.





यावेळी मनोगत व्यक्त करताना श्री ह भ प्रकाश महाराज बोधले म्हणाले की बेलेश्वर संस्थानचे अध्यात्मच सोन सांभाळणारा श्रेष्ठ असतो.महंत महादेवानंद भारती महाराज यांनी हे सांभाळून ठेवला आहे. महंत तुकाराम महाराज यांनी बेलेश्वर संस्थांची महती महाराष्ट्रभर घेऊन जावी अशी अपेक्षा व्यक्त केली. बेलेश्वर संस्थान हे सोनं आहे त्या कोंदणात महंत तुकाराम महाराज यांच्यासारखे रत्न मिळाल. तुकाराम महाराजांनी संस्थांची सेवा केली दिंडी तसेच भाविकांना एकत्रित करण्याचे काम केले आहे अगोदर सेवा केली त्यानंतर कारभार हाती सोपवला..भाविक भक्तांनी ही संस्थांच्या वाटचालीमध्ये सर्वांनी सहकार्य करावे. सर्व मान्यवर संतांचे आशीर्वाद तुकाराम महाराज भारती यांच्या पाठीशी आहेत. अशा भावना महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी व्यक्त केल्या. सेवाभावातून बेलेश्वर संस्थांची महती आणि विकासही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. निस्वार्थपणाने परमार्थासाठी जीवन समर्पित करणारे महात्मे मिळाल्याने देवस्थानची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे.. असं श्री महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी यांनी सांगितलं. सर्व संत महंत मान्यवरांच्या आशीर्वादानंतर महंत तुकाराम महाराज भारती यांनी सर्व उपस्थित यांचे आभार मानले व सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश ठोसर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील तरुण मंडळी, मोठे कष्ट घेतले. कार्यक्रमासाठी परिसरातील सर्व गावचे सरपंच प्रतिष्ठित मंडळी आणि भक्त मंडळी उपस्थित होते..

## पाटोदा पं.स.ची कोट्यवधींची नवीन इमारत धुळखात पडुन

### येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी उद्घाटन होणार का?



पाटोदा। प्रतिनिधी

पाच वर्षांपूर्वी बांधून पूर्ण झालेली पाटोदा पंचायत समितीची नवी इमारत अजूनही धुळखात पडून आहे. बीड जिल्ह्यातील बहुतेक पंचायत समित्या नव्या इमारतीत कार्यरत असताना, पाटोदा मात्र तांत्रिक कारणांची ढाल पुढे करत कोट्यवधी रुपयांची इमारत वापरात आणण्यात अपयशी ठरली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजन शून्यतेवर सवाल निर्माण होत आहेत.या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली, परंतु अद्याप अधिकृत उद्घाटन झालेले नाही. दरवर्षी नवीन तारखा देऊन ही बाब पुढे ढकलली जात आहे. आता जनतेच्या मनात प्रश्न आहे ''या येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी या इमारतीचे उद्घाटन होणार का तालुक्यातील नागरीक, ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी व स्थानिक नेते यांच्यातही या मुद्द्यावरून नाराजी वाढत आहे. पाटोदा तालुका विकासाच्या दृष्टीने मागे पडू नये यासाठी ही इमारत तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.एकीकडे जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांच्या इमारतींचे लोकार्पण मोठ्या उत्साहात केले, तर दुसरीकडे पाटोद्याची इमारत मात्र पावसात ओलसर होत,गंजत व उन्हाळ्यात धूळ खात पडून आहे.या इमारतीच्या वापरा बाबत तांत्रिक अडचणी नेमक्या काय आहेत, त्यावर कोण उपाययोजना करणार, आणि येणाऱ्या १५ ऑगस्टला अखेर उद्घाटन होणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## ज्येष्ठांनी सकारात्मक, आनंदी, ताणतणावमुक्त राहावे-डॉ.दीपा क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी

जीवनाच्या संध्याकाळी एकटेपणा न बाळगता, सकारात्मक, आनंदी व ताणतणावमुक्त राहावे. मन प्रसन्न ठेवण्यासाठी छंद जोपासावेत व सतत कार्यरत राहावे, असे मत डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा, बीड आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) महाविद्यालय, नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी 'संधीकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात गणेश वंदना, गीत, योगनृत्य, मंगळागौरी गीते, भारूड, फील्मी गीते, गजल गायन, एकपात्री अभिनय, विनोदी काव्य, झुंबा नृत्य, काव्यवाचन, उखाणे, मुशायरा अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. जिल्हाभरातून २०० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रंगतदार सादरीकरण केले. कार्यक्रमाला डॉ. सारिका क्षीरसागर, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर आदींची उपस्थिती होती. सहभागी ज्येष्ठांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. दुष्यंता रामटेके यांनी केले, तर आभार डॉ. अनिता शिंदे यांनी मानले. डॉ. राहुल सोनवणे, प्रा. दीपक जमधाडे, प्रा. सुरेश थोरात, इंद्रजीत भांगे यांनी संगीताची साथ दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. विजय राख, प्रा. सोनाली गवारे, प्रा. नागेश शेटे, मिलिंद शिवणीकर, नामदेव साळूंके यांनी सहकार्य केले.



## एमएसईबी पाटोदा कार्यालयाचा सावळा गोंधळ

पाटोदा । प्रतिनिधी

कृषी सोलार पंप साठी दोन वेळेस पैसे भरून देखील सोलार पंप मिळेना गीतेवाडी ता.पाटोदा जि.बीड येथील पारूबाई रावसाहेब गीते यांनी दिनांक ३ /१० /२०२४ रोजी पैसे भरून अर्ज रिजेक्ट करण्यात आला व पैसे देखील मागणी करून आजपर्यंत परत मिळाले नाही नऊ महिने झाले पैसे भरून एमएससीबीच्या दुर्लक्षामुळे पैसे परत मिळाले नाही व पुन्हा एमएसईबी कार्यालयाने सांगितले की पहिले पैसे परत येतील नवीन अर्ज करून दुसरे पैसे भरावे व त्यांनी दुसऱ्यांदा २२ हजार ९७१ रुपये दिनांक २४/ ३ /२०२५ रोजी भरले अद्याप त्यांना दोन वेळेस पैसे भरून ही पैसे परत मिळेना व सोलर पंप देखील मिळेना संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी करण्यात येत आहे लोकप्रतिनिधी प्रशासन यांनी या गरीब शेतकऱ्यास न्याय द्यावा अन्यथा आंदोलनाचा पवित्रा स्वीकारला जाईल.शासनाच्या योजना कल्याणकारी शेतकरी हिताच्या असतात परंतु एमएसईबीच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यास आत्महत्या करण्याची वेळ आली आहे यास संबंधित कार्यालय जबाबदार असेल.



**बीड : शेवगाव निवासी श्री संत गजानन महाराज यांची पालखी आषाढी वारी करून परतीच्या मार्गावर असतांना आज बीड शहरात मुक्कामी आहे. बालाजी मंदिर पेठ बीड या ठिकाणी दुपारच्या भोजनासाठी विसवली असता शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना दोन हजार मोतीचूर लाडू चे वाटप केले. यावेळी संजय महाद्वार, नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, राजाभाऊ हुरकुडे, गणेश लोणकर, सतीशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर सह शिवसैनिक उपस्थित होते.**

## अध्यक्षपदी गणेश टकले, व उपाध्यक्ष शाम उजगरे यांची निवड



वडवणी । प्रतिनिधी

आज दिनांक १७/०७/२०२५ गुरुवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग येथे पालक बैठक शाळेचे मुख्याध्यापक कांगणे सर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी वर्ग पहिली ते चौथी वर्ग पर्यंत पर्यंत च्या पालकांची सदस्य निवड करुन पुढील सर्वानामते शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष पदी गणेश टकले व उपाध्यक्ष पदी शाम उजगरे यांची निवड करण्यात आली.तसेच सचिव मुख्याध्यापक श्री कांगणे सर यांची निवड करण्यात आली.व सदस्य महिला सदस्य सौ.पुजा टिपरे,सौ.मंदा वरवडे,सौ.खाडे सारिका ,सौ.रेडेकर गायत्री ,सौ.हेंद्रे प्रणाली,फासे दत्तात्रेय,कुरकूटे नंदकुमार, नगरसेवका सौ.डिगे रंजना, अंगणवाडी सेविका वारे रुक्मिणी, शिक्षीका जाधव ए.जे.यांची निवड करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे माजी अध्यक्ष शंकर झाडे, शाळेचे शिक्षक कांगणे सर ,डोरले सर, राठोड सर, जाधव मॅडम,जाधवर मॅडम, गव्हाणे मॅडम,राख मॅडम, कुंभार मॅडम,इ.पालक उपस्थित होते.यावेळी गटशिक्षणाधिकारी मा.बाबासाहेब उजगरे साहेब, केंद्र प्रमुख श्री सुरेश करांडे सर, केंद्रीय मुख्यापिका तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय व्यवस्थापन समिती ची निवड करण्यात आल्या व सर्वांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सामाजिक परिवर्तनाच्या मार्गदर्शकांना अभिवादन

बीड। प्रतिनिधी

साहित्य, संघर्ष आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन आणि आंबेडकरी चळवळीत होवून गेलेले ज्वलंत कार्यकर्ते, निर्भीड पत्रकार सुधाकर सोनवणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम बीड शहरातील अंकुश नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रान्स टू पॉलिटिक्स, बीड येथे आज शुक्रवार दि.१८ रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रान्स टू पॉलिटिक्स, व पत्रकार संघ बीड यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमास अध्यक्ष सतीश बनसोडे हे राहणार असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.प्रमुख उपस्थितीत सुभाष साळवे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड), युवराज सोनवणे, अनिल डोंगरे (माजी जिल्हाध्यक्ष, भारिप),उत्तम हजारे, भागवत तावरे, सुनील डोंगरे, अशोक सोनवणे, ॲड.राजेश शिंदे, डॉ. अशोक गायकवाड, सिद्धार्थ शिनगारे असणार आहेत. या अभिवादन सभेच्या माध्यमातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक क्रांतीकारी साहित्याचा व सुधाकर सोनवणे यांच्या निःस्वार्थ पत्रकारितेला उजाळा देण्यात येणार आहे.कार्यक्रमात त्यांच्या कार्याचा जागर होणार असून, पुढील पिढीसाठी मार्गदर्शन ठरणारे विचार मांडले जातील.

## दामिनी पथकाने दिले मुलींना आत्मसंरक्षणाचे धडे

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली दामिनी पथक प्रमुख पीएसआयपल्लवी जाधव आणि त्यांचे टीमकडून शाळा, कॉलेज मधे भेट देवून मुलींना आत्मसंरक्षणचे धडे देण्यात येत आहे.

दामिनी पथक हे मुली , महिला आणि बालकांसाठी काम करते. यामध्ये शाळा, कॉलेज, क्लासेस, वसतिगृह, स्वाधारगृहला भेटी देवून मुलींच्या समस्या जाणून घेणे. मागील आठवड्यात जि. प. शाळा पाली येथे महिला आयोग सदस्य व दामिनी पथकाने ''सक्षम तू'' या अभियाना अंतर्गत, मुलींना विविध विषयावर मार्गदर्शन केले होते. तर दिनांक १४/०७/२०२५ रोजी दामिनी पथकाकडून संगमेश्वर विद्यालय नाळवंडी माध्यमिक शाळेतील मुली आणि बालकांना, बालकांचे अधिकार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, गुडटच-बॅडटच, बालविवाह प्रतिबंध कायदा, महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार अशा अनेक विषयावर व कायद्याबाबत मार्गदर्शन केले तसेच दैनंदिन वापराच्या वस्तूने आत्मसंरक्षण कसे करायचे याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना तत्काळ मदती साठी टोल फ्री हेल्पलाईन ११२, १०९१, १०९८ वर कॉल करणे तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला कोड वर तक्रार करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.त्याचप्रमाणे दामिनी पथक हे शहरात तसेच तालुक्याच्या ठिकाणी जावून बस स्टँड, शाळा, कॉलेजच्या समोर, क्लासेस अशा वर्दळीच्या ठिकाणी गस्त करुन रोडरोमियोवर कारवाई करत आहे. ''बीड शहर व जिल्ह्यातील महिलांना सार्वजनिक ठिकणी, शाळा, महाविद्यालय परिसरात, कामाच्या ठिकाणी कोणी रोडरोमिओ विनाकारण त्रास देत असेल किंवा छेड काढत असेल तर वर नमुद टोल फ्री क्रमांक किंवा संवाद प्रकल्प वर तात्काळ तक्रार करण्याचे आवाहन'' पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी केले आहे.





जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८१**

**दिनांक -०३/०७/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सुधाकर जिजाभाऊ मानमोडे रा. पराडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगाच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक सुधाकर मानमोडे | मुलगा | १७/०२/२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**


# गुरुवारी पाहाटे झालेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे; दुबार पेरणीचे संकट टळले

ज्योतिराम पाढंरपोटे

माजलगाव:- तालुक्यातील जवळपास सर्वच महसुली मंडळात दि १६ जुलै बुधवार रोजी सायंकाळी व दि १७ जुलै गुरुवार रोजी पाहाटे ५:०० ते ७:३० वाजेपर्यंत पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे दुबार पेरणीचे संकट टळले असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून या झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

पावसाने प्रामुख्याने पेरणी झालेल्या सोयाबीन,कापुस,मुग,बाजरी या पिकाला मोठा फायदा होणार आहे.पर्जन्यवृष्टी झाली असल्याने खरीप पिकांना आधार लाभला आहे. त्यामूळे दुबार पेरणीच्या संकटातून सुटका झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे,तर काही भागात विहिरींना देखील पाणी उतरण्यास प्रारंभ झाला असून शेतकरी आणखी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

तालुक्यातील ८ महसुली मंडळात आतापर्यंत ८५ ते ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. उर्वरीत पेरण्यांनाही शेतकरी गती देत. यावर्षी शेतकऱ्यांनी सोयाबीन लागवडीस अधिक प्राधान्य दिले असून त्यापाठोपाठ कापुस,तुर,मुग व बाजरी लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल दिसून आला आहे.

यावर्षी जूनच्या सुरूवातीला चांगला पाउस झाल्याने माजलगाव तालुक्यातील आठ ही मंडळातील शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने खरीप पिकांची पेरणी उरकली.मे महीन्यातच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची खरीप पेरणीपूर्वी मशागतीची कामे रखडली होती.परंतु शेतकऱ्यांनी अवकाळी पावसाचा सामना करत पेरणीपूर्व मशागतीची कामे आटोपली.काही शेतकऱ्यांनी हात उसनवारीने तर काहींनी पिकांच्या उत्पन्नातून बियाण्याचे पैसे देण्याचा वायदा करून तसेच काहींनी मुलांच्या शिक्षणासाठी राखून ठेवलेल्या पैश्यातून बियाण्याची खरेदी केली. पेरणीनंतर मात्र पावसाने पंधरा ते वीस दिवस पाठ फिरवल्याने पिके पिवळी पडू लागल्याने दुबार पेरणी करावी लागते की काय? या विवंचनेत शेतकऱ्यांची चिंता वाढली होती.गेल्या काही दिवसांपासून आकाशात रोज ढग दाटून येत होते.मात्र पाऊस पडत नव्हता मात्र दोन दिवसापासून उकाडा होत होता. हवा बंद व दमट वातावरण निर्माण होऊन दि १६ जुलै बुधवार रोजी सायंकाळी पावसाच्या हलक्या सरी पडल्या.तर दि १७ जुलै गुरूवार रोजी पाहाटे पावसाने चांगलीच हजेरी लावली. पावसाने जोरदार हजेरी लावल्याने माजलगाव तालुक्यातील महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा आधार मिळाला. या जोरदार पावसामुळे तापमानात घट होऊन हवेत गारवा निर्माण झाला आहे. पाऊस जोरदार असल्याने पिकांवरील काही प्रमाणात अळींचा प्रादुर्भाव कमी होईल,असे मत शेतकरी व्यक्त करत शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे,तर यापुढे पर्जन्यमान चांगले राहून खरीप उत्पादन वाढण्याची शेतकरी वर्गास अपेक्षा आहे.



# महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने काम बंद आंदोलन

## मागण्या मान्य झाल्या नाही तर उद्यापासून बेमुदत संपावर जाणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात राज्य परिचारिका संघटनेने विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. यामध्ये प्रामुख्याने सातव्या वेतन आयोगानुसार वेतनातील असमानता आणि कंत्राटी परिचारिका भरतीला विरोध करणे, तसेच इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे.**



राज्यातील परिचारिकांच्या बाह्य स्त्रोताद्वारे पदभरती व इतर संवेदनशील प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर, संघटनेने आपल्या सर्व शाखासह राज्यव्यापी आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील परिचारिका आपल्या सर्व सभासदासह सहभागी झाल्या आहेत.दि. १५ व १६ जुलै २०२२५ धरणे आंदोलन व निदर्शने आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आले होते.मात्र या वेळी त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या नाही.त्यामुळे दि.१७ जुलै २०२५ रोजी एक दिवस काम बंद आंदोलन करण्यात येत आहे.काम आंदोलनाची दखल न घेतल्यास दि १८ जुलै २०२५ पासून राज्यव्यापी बेमुदत संप करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे.या वेळी संघटनेचे अध्यक्ष आशा यादव, सचिव कृष्णा शिंदे, मीरा जाधव,उषा राठोड,रजिया शेख,छाया सानप,स्वप्निल गाडे,समीर सय्यद,दत्ता गवळी, रोशनी भालेराव,वसंत राऊत, खेलबा सोनटक्केसंघमित्रा ताटे, वर्षा सौताडेकर,आशा भोसले, माधवी भोसले,सल्लागार दादासाहेब घोळवे, विश्रांती पवार, मेघा गुणाल, स्वप्ना आगाव, उषा गोचडे, अलका मेहकर.सह शेकडो परिचारिका उपस्थित होत्या.सह शेकडो परिचारिका आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

### आंदोलनाची दिशा

**आज संघटना व सरकारसोबत चर्चा करण्यात येणार असून यावेळी त्यांनी मागण्या मान्य केल्या नाहीत तर उद्यापासून बेमुदत संपावर जाणार आहोत.**

**आशा यादव**
**अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा अंबाजोगाई**



**जालना : पर्यावरण मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची मुंबई येथे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी भेट घेऊन जालना जिल्ह्यातील विकासात्मक कामाबाबत चर्चा केली. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख विशाल गाढे, युवा सेना तालुकाप्रमुख गणेश पुंगळे ,रामेश्वर दराडे ,राम खाडे यांची उपस्थिती होतीण**

## अमोलकमध्ये पंजाबराव डख यांचे शनिवारी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

आष्टी । प्रतिनिधी

कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ या संस्थेच्या शताब्दी वर्षपूर्ती निमित्त नवीन डिजिटल क्लासरूम चे उद्घाटन तसेच निसर्ग मित्र, वृक्षमित्र पुरस्कार वितरण सोहळा व तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हवामान तज्ञ श्री पंजाबराव डख यांचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन शनिवार दिनांक १९ जुलै रोजी सकाळी दहा वाजता अमोलक इंजीनियरिंग कॉलेजच्या प्रांगणात करण्यात आले आहे.



ईलॅस्टिक रन पुणे या कंपनीकडून श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालयासाठी नवीन डिजिटल रूम निर्मितीसाठी लॅपटॉप ◀◀ पान ३ वर

## माजलगाव बस स्थानकातून दीड तोळ्याचे गंठण चोरीस

माजलगाव । प्रतिनिधी

येथील बसस्थानकात बस मध्ये बसत असताना सौ सरला जाजू यांचे दीड तोळ्याचे आजच्या बाजार भावा प्रमाणे अंदाजे दीड लाख रु चे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यानी चोरल्याची घटना दि १६ जुलै बुधवार रोजी सकाळी ९:०० वाजण्याच्या सुमारास वाजता घडली आहे.

याबाबत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात सौ जाजू यांनी दिलेल्या फिर्यादी मध्ये असे म्हटले आहे की,दि १६ जूलै बुधवार रोजी सकाळी अंदाजे ९:०० वाजता बीड कडे जाण्यासाठी महामंडळाच्या इलेक्ट्रिकबस मध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तीने गळ्यातील दीड तोळ्याचे मंगळसूत्र चोरले असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय सहिंता कलम ३०३ नुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल गोविंद पाखरे हे करत आहेत. शहरात पाकीटमार गंठन चोर यांची संख्या वाढली असून माजलगाव बस स्थानकात पोलीस कर्तव्य बजावत असल्याचे क्वचित दिसते यामुळे चोराचे फावत आहे शिवाय बस स्थानक नूतनिकरणाचे काम सुरु झाल्यामुळे बस स्थानक परिसरातील सी सी टी व्ही दि १५ जुलै मंगळवारी रात्रीच काढण्यात आले आहे.यामुळे येणाऱ्या काळात चोरांचे चांगलेच फावले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना सर्व बसेसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देणार -परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (रा.प. महामंडळ) बसेसमधून प्रवास करणाऱ्या अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना दिल्या जाणाऱ्या सवलतीत लवकरच सुधारणा केली जाणार आहे. तसेच काही नवीन सवलती देखील लागू करण्याचा प्रस्तावही शासन पातळीवर विचाराधीन असून, याबाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.**




अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना एस.टी.च्या सर्व बसेसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येणार आहे. एसटी बस सीट आरक्षित करण्यासाठी १५ ऑगस्टपासून ऑनलाइन आरक्षणाची सुविधा देण्यात येईल तसेच आठ हजार की.मी. पर्यंत प्रवासाची मर्यादाही काढणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. विधान भवनात मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत आधीस्वीकृतीधारक पत्रकारांच्या एसटी बस प्रवासाच्या सवलतींच्या मुद्यावर गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद यादव, कार्यकारिणीचे सदस्य प्रशांत बारसिंग आदी पदाधिकारी उपस्थित होते. सद्यस्थितीत अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना साध्या, निमआराम व शिवशाही (आसनी/ शयनयान) बसप्रकारामध्ये १००% प्रवास भाड्याची सवलत मिळते. मात्र, या सवलतीवर आठ हजार किमीची मर्यादा आहे. ही मर्यादा रद्द करण्याची मागणी वारंवार होत असून, ती मंजूर करण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. तसेच पत्रकारांना

## कर्कश आवाज करणाऱ्या बुलेट सायलेन्सरवर बुलडोजर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई वाहनधारकांच्या कर्कश्य सायलंसरच्या आवाजाने अंबाजोगाई शहरातील नागरीक त्रास झाले होते याबाबत प्रसार माध्यमांनी आवाज उठविल्यानंतर बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या आदेशानुसार अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पीआय शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाने वाहतूक पोलिसांच्या पथकाने आज गुरुवार दि १७ रोजी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ३० बुलेट सायलेन्सर वर बुलडोझर फिरवण्यात आले.**



मागील कित्येक महिन्यापासून अंबाजोगाई शहरात कर्णकर्कश हॉर्न, लावून बुलेट अती आवाजाने नागरिक पूर्ण त्रस्त झाले होते. काही हृदय रोगी वयोवृद्ध नागरिकांना रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागले आहेत. सामान्य नागरिकांना होत असलेल्या त्रासामुळे माध्यमांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून आवाज उठविला होता. याची दखल घेत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी अंबाजोगाईत संवाद बैठक घेतल्यानंतर अंबाजोगाई येथील वाहतूक शाखेच्या पथकाला सूचना केल्या कर्कश्य आवाज करणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करावी व त्या बुलेटचे सायलेन्सर काढून पोलीस स्टेशनला जमा करण्यात यावे ते जमा केलेले सर्व सायलेन्सर आज रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सकाळी ११ वाजता जमिनीवर अंथरूण त्यावर बुलडोजर फिरवण्यात आले. यामुळे मोठ्या आवाज करणाऱ्या वाहनधारकांना चांगलाच चाप बसणार आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई शहरात शाळा व ट्युशन साठी अल्पवयीन मुले मुली ज्या गाड्या चालवतात त्यांच्यावरही वाहतूक पोलिसांची बारीक नजर असणार आहे त्यांच्याकडून अपघात घडला तर त्यांच्या पालकांना कारवाईला सामोरे जावे लागेल असे स्पष्टपणे सुचित करण्यात आले अंबाजोगाई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी झालेल्या कारवाईत ए पीआय कांबळे, वाहतूक पोलीस मधुकर रोडे, पीडी फड, बाळासाहेब पारवे, पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत चादर,दत्तात्रे इंगळे, कृष्णा वडकर आदी कर्मचारी उपस्थित होते.

## नारायण गडाची बदनामी खपवून घेतली जाणार नाही –जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखो भक्तांनचे श्रद्धास्थान असलेल्या धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगडाविषयी व गुरुवर्य शिवाजी महाराजविषयी काही विश्वस्त व काही लोक जाणीवपूर्वक बदनामी करत असुन गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न करिता आहेत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी नगद नारायण गडावर जाऊन शिवाजी महाराज यांची भेट घेतली व त्यांचा सत्कार करुन आशिर्वाद घेतले , यावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी शिवाजी महाराज यांना सांगितले की ,बाबा नारायण गडाविषयी चाललेली बदनामी बघुन मी व्यथित झालो असुन आपल्या भेटीसाठी आलेलो ◀◀ पान ३ वर

## अवैद्य गुटखा विक्री करणारांवर माजलगाव पोलीसांची कारवाई

माजलगांव । प्रतिनिधी

शहरातील प्रभू श्रीराम ट्रेडिंग कंपनी किराणा दुकान,जुना मोंढा येथे इसम नाव किशोर शिवलिंग कानडे रा.पाटील गल्ली माजलगाव हा त्याचे किराणा दुकानांमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित गुटखा पान मसालाची चोरटी विक्री करत असल्याचे माहितीवरून त्याच्या दुकानातून दि ३० जुन २०२५ रोजी प्रतिबंधीत गुटखा,पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थ एकूण १५,६४४/- रुपयाचा गुटखा मुद्यामाल जप्त करण्यात आला होता.

दि १५ जुलै २०२५ रोजी फिर्यादी नामे अनुराधा ज्ञानदेव भोसले अन्नसुरक्षा अधिकारी,अन्न व औषध प्रशासन विभाग बीड यांच्या फिर्यादीवरून गु.र.नं. २६७/२०२५ अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम २६(२) (आय.व्ही), २७(३) (डी),२७(३)(ई), सहवाचन कलम ३० (२) (अ) चा भंग करून शिक्षापात्र कलम ५९ तसेच भारतीय न्याय संहिता कलम १२३,२३३,२७४,२७५ प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर आरोपीस अटक करून एक दिवसाची पोलीस कोठडी ◀◀ पान ३ वर

## गेवराईत बंजारा मेळाव्याची जय्यत तयारी

### मंत्री इंद्रनील नाईक व आरोग्यदुत रामेश्वर नाईक यांची उपस्थिती

गेवराई । प्रतिनिधी

हरित क्रांतीचे प्रणेते,महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कृषी तज्ञ,महानायक वसंतरावजी नाईक साहेब यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यातील गेवराई शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, राज्यस्तरीय बंजारा भूषण पुरस्काराचे वितरण तसेच बंजारा समाजाचा भव्य एकता मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे.





महानायक वसंतरावजी नाईक साहेब जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित बंजारा एकता मेळाव्याचे उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक साहेब यांचे गुणवान कर्तृत्ववान नातू तथा राज्याचे मृद व जलसंधारण,उद्योग,आदिवासी विकास,पर्यटन, सार्वजनिक बांधकाम तसेच उच्च तंत्र व शिक्षण राज्यमंत्री ◀◀ पान ३ वर

## अरण तीर्थक्षेत्रासाठी १५०.२३ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर

बीड । प्रतिनिधी

संत शिरोमणी श्री सावता महाराज यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र अरण (ता. माढा, जि. सोलापूर) येथील संजीवन समाधी विकासासाठी ग्रामविकास विभागामार्फत १५०.२३ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. ही अत्यंत आनंददायक व अभिमानास्पद बाब असल्याचे महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एड. सतीश शिंदे यांनी म्हटले आहे. त्यांनी मुख्यमंत्री आणि संबंधित सर्व मंत्र्यांचे महात्मा फुले युवा दलाच्या वतीने आभार मानले आहेत.



या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , मंत्री अतुल सावे , व मंत्री जयकुमार गोरे,मंत्री भुजबळ यांचे महात्मा फुले युवा दलाच्या वतीने एड. सतीश शिंदे यांनी आभार मानले आहेत.दि. ६ सप्टेंबर २०२४ रोजी श्री क्षेत्र अरण येथे पार पडलेल्या भूमिपूजन सोहळ्यात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अ' वर्ग दर्जा व तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची घोषणा केली होती. त्यानुसार दि. १५ मे २०२५ ◀◀ पान ३ वर

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पोथरा येथे शेतात जाऊन केली कोळपणी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यात नेकनूर मंडळात केजच्या हद्दीला लागून पोथरा हे गाव आहे . या गावी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , नेकनूरचे मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , पोथऱ्याचे तलाठी अक्षय चव्हाण , तलाठी सर्वेश कांबळे , तलाठी प्रशांत नलावडे यांनी भेट दिली . यावेळी मधुकर साहेबराव दराडे , सुरेश हावळे उपस्थित होते .

शेतकरी कोळपणी करत असल्याचे बघून तहसीलदार थांबले. मलाही कोळपणी करण्याचा अनुभव घेऊ द्या , असे त्यांनी बोलून दाखविले . त्या ठिकाणी कोळपणी करण्याची पद्धत समजून घेतली . स्वतः कोळपणी करण्याचा अनुभव घेतला . शेतकरी दराडे यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी



माहिती घेतली. यावेळी दराडे यांनी माहिती दिली की त्यांच्या शेतात बहुतांश वेळा सोयाबीन हेच पीक घेतल्या जाते . जमीन सुपीक असली तरी बारमाही पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना खरिपात हेच पीक परवडते . यापूर्वी ते कपाशीचे पीक घेत असत . तथापि कपाशीच्या पिकावर असणाऱ्या रोगराई , त्यास लागणारा खर्च इत्यादी विचारात घेता त्यांना सोयाबीन पीक हे परवडत आहे.

शासनाच्या शेतकऱ्यांसाठी अनेक योजना असतात . कृषी विभाग , महसूल विभागामार्फत या योजनांची अंमलबजावणी होत असते . शेतकऱ्यांचे काय प्रश्न आहेत याबद्दलची माहिती प्रत्यक्ष भेटी दिल्याशिवाय कळत नाही . त्या अनुषंगाने तहसीलदारांची प्रत्यक्ष शेतावर भेट महत्त्वाची ठरते. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे प्रत्येक तालुक्यास भेट देऊन सर्वसामान्य जनता, नागरिक यांचे प्रश्न समजावून घेत आहेत . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी आल्यापासून अनेक उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे . शेतकऱ्यांच्या अडचणी असल्यास ते व्यवस्थितरित्या समजून सांगतात . संबंधित उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधून नागरिकांची कामे सोप्या पद्धतीने कशी होतील याची दक्षता बाळगतात.बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या शेतकऱ्यांप्रती अत्यंत कनवाळू आहेत . सर्वसामान्य ◀◀ पान ३ वर

**बीड तालुक्यातील पीक पेरणीचा विचार केला असता बाजरी ९८५६ हेक्टरवर , मका २१५४ हेक्टर , तूर ५४०८ हेक्टर , मूग ३२४५ हेक्टर , उडीद ३४१५ हेक्टर , भुईमूग ४० हेक्टर , तीळ १५ हेक्टर , सोयाबीन ४६,२४१ हेक्टरवर , कापूस ५१,८२४ हेक्टरवर अशाप्रकारे १, २२, २५३ हेक्टरवर पेरणी झाल्याचे दिसते .**

**बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत . या सर्व तालुक्यांचा विचार केला असता सरासरी ८७% हेक्टरवर खरिपाची पेरणी झाल्याचे समजते . यावर्षी मे महिन्याच्या शेवटी शेवटी चांगल्या प्रकारे पाऊस झाला असला तरी जून महिन्यातील पाऊसमान हे सलग दिसत नाही . अधून मधून पावसाच्या सरी येतात . त्यामुळे पिके तग धरून आहेत . तथापि मोठ्या पावसाची प्रतीक्षा दिसून येते .**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canal Road Beed, Tal. Dist. Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, (mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बुधवार पेठेत जाणं पुण्याच्या आयटी इंजिनिअरला महागात पडलं, आधी ब्लॅकमेलिंग, मग पोलिसांकडून झाडाझडती

**पुणे । प्रतिनिधी**

अलीकडच्या काळात वाढलेल्या गुन्हेगारी घटनांमुळे सातत्याने चर्चेत असलेल्या पुण्यात आता लोकांना लुबाडण्याचा नवा प्रकार समोर आला आहे. पुण्यातील बुधवार पेठेत वेश्यागमनासाठी जाणाऱ्या व्यक्तींचे व्हिडीओ चित्रित करुन त्यांना ब्लॅकमेल करुन त्यांच्याकडून पैसे उकळले जात होते. नांदेड सिटी (छरपवशव उळींू झींपश) पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी पुणे पोलिसांनी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आयुष राजू चौगुले, सदफ पठाण असं अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत .आयुष चौगुले आणि सदफ पठाण या दोघांनी एका आयटी इंजिनिअरला अशाचप्रकारे गाठून त्याच्याकडून २० हजार रुपयांची मागणी केली. हा आयटी इंजिनिअर तरुण सिंहगड रोडवरील किरकिटवाडी भागात राहायला होता. तो आणि त्याचा मित्र १३ जुलैला एका कामानिमित्त बुधवार पेठेच्या परिसरात गेले होते. त्यावेळी हा तरुण त्याची



बाईक घेऊन बुधवार पेठेच्या परिसरात उभा होता. त्यावेळी आयुष चौगुले आणि सदफ पठाण या दोघांनी मोबाईलमध्ये त्याचा व्हिडीओ काढला. काम आटोपल्यानंतर या दोघांनी आयटी इंजिनिअरचा नांदेड सिटी येथील घरापर्यंत पाठलाग केला. हा तरुण विवाहित होता. हा प्रकार घडला तेव्हा त्याची पत्नी आणि मुलं घरी नव्हती. आयुष चौगुले आणि सदफ पठाण यांनी या तरुणाला घराजवळ गाठून, 'तू बुधवार पेठेत कशाला गेला होतास?', असा प्रश्न विचारला. त्यानंतर आयुष आणि सदफने बुधवार पेठेत चित्रित केलेला व्हिडीओ दाखवून तरुणाला धमकावले. त्याच्याकडे २० हजार रुपयांची मागणी केली. मात्र, या तरुणाने पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर आयुष चौगुले आणि सदफ पठाण या दोघांनी संबंधित तरुणाला घाबरवण्यासाठी आणखी एक डाव टाकला. 'तू आमच्याकडून २० हजार रुपये रोख घेतले आहेत. हे पैसे तू आम्हाला ऑनलाईन पद्धतीने परत देणार होतास. तू ते पैसे दिले नाहीस तर आम्ही पोलिसांत तक्रार करु. चौकशीवेळी आम्ही बुधवार पेठेतील तुझे व्हिडीओ आणि फोटो पोलिसांना देऊ. तुझी बदनामी करु', असे आयुष आणि सदफने संबंधित तरुणाला सांगितले. त्यानंतरही हा तरुण त्यांना पैसे द्यायला तयार नव्हता. अखेर या दोघांनी पोलीस हेल्पलाईनवर फोन करुन पोलिसांना बोलावून घेतले. पोलिसांकडे या दोघांनी आयटी इंजिनिअर असलेल्या तरुणाची तक्रार केली. सुरुवातीला पोलिसांना आयुष आणि सदफचे म्हणणे खरे वाटले आणि त्यांनी तरुणालाच जाब विचारायला सुरुवात केली. अखेर एका स्थानिक पत्रकाराच्या मदतीने या तरुणाने आपली बाजू पोलिसांना तपशीलवार समजावून सांगितली. तेव्हा हा सगळा प्रकार पोलिसांच्या लक्षात आला आणि त्यांनी आयुष चौगुले आणि सदफ पठाण या दोघांना अटक केली.

# वरुणराजाच्या उपस्थितीत माऊलींचा परतीचा प्रवास सुरू; पादुकांना नीरा स्नान संपन्न

**नीरा । प्रतिनिधी**

पंढरपूरहून आळंदीकडे परतीच्या प्रवासाला निघालेला माऊलींचा पालखी सोहळा आज पुणे जिल्ह्यात दाखल झाला. पुणे जिल्ह्यातील निरा नदीकाठच्या नीरा (ता. पुरंदर) शहरामध्ये माऊलींच्या पालखी सोहळ्याच आगमन मंगळवारी सकाळी नऊ वाजता झाले. त्यापूर्वी निरा नदीमध्ये माऊलींच्या पादुकांना परतीच स्नान घालण्यात आलं. माऊली माऊलीचा गजर करत वरुणराजाच्या उपस्थितीमध्ये माऊलींच्या पादुकांना निरा नदीमध्ये स्नान घालण्यात आले .यानंतर हा पालखी सोहळा दुपारच्या विसाव्यासाठी नीरा येथील विठ्ठल मंदिरात विसावला. पंढरपूरहून पुन्हा अलंकापुरीकडे निघालेला संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा काल रात्री सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील पाडेगाव येथे विसरला होता. आज सकाळी हा सोहळा पुणे जिल्ह्यातील वाल्मीकाची नगरी असलेल्या वाल्हे नगरीतील मुक्कामासाठी मार्गस्थ झाला. त्यापूर्वी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालकांना नीरा नदी काठावर परतीचे स्नान घालण्यात आले.यानंतर नीरा नगरीमध्ये नीरा ग्रामस्थांनी या पालखी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात स्वागत केलं. माऊलींचा आजचा मुक्काम हा वाल्हे येथे असणार आहे. तर उद्याचा मुक्काम संत सोपानकाकांची नगरी असलेल्या सासवड येथे असणार आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यामध्ये परतीच्या प्रवासामध्ये निरा नदी काठावर स्नान झाल्यानंतर परतिच्या वारीत सहभागी असलेल्या या वारकऱ्यांना संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे स्पर्श दर्शन दिले जाते. माऊलींच्या पादुकांचे निरास्नान झाल्यानंतर रथापुढे आणि



रथा मागे चालणाऱ्या वारकऱ्यांना ते उभे असलेल्या ठिकाणी माऊलींच्या पादुका नेऊन त्यांना स्पर्श दर्शन देण्याची परंपरा आहे. गेल्या वर्षी या वारकऱ्यांना या स्पर्श दर्शनाचा लाभ देण्यात आला नव्हता. त्यामुळे वारकऱ्यांनी माऊलींचा रथ अडवला होता. मात्र यावर्षी कोणताही वाद-विवाद तंटा न होता वारकऱ्यांना माऊलींच्या पादुकांचे स्पर्श दर्शन मिळाले आणि वारकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.निरा नदित पादुकांच्या स्नानानंतर सोहळा मालकांनी प्रथम रथा मागील व नंतर रथा पुढील विणेकऱ्यांसह पायी चालणाऱ्या वारकऱ्यांन माऊलींच्या पादुकांचे स्पर्शदर्शन दिले. यानंतर वारकऱ्यांनी पुन्हा एकदा माऊली माऊली चा गजर करत माऊलींच्या या मार्गावर नतमस्तक होत पायी चालण्यास सुरुवात केली. नीरा येथील विठ्ठल मंदिरामध्ये माऊलींच्या या सोहळ्याला सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने दुपारचे भोजन देण्यात आले.दुपारी दोन वाजेपर्यंत विसावा घेतल्या नंतर माऊलींचा पालखी सोहळा दुपारी दोन वाजता मुक्कामासाठी वाल्हे नगरीकडे मार्गस्थ झाला .

# शिवणेतील मंडल अधिकाऱ्याला दोन लाखांची लाच घेताना अटक

**पिंपरी । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील शिवणे येथील मंडल अधिकारी आणि त्याच्या एका खासगी साथीदाराला दोन लाख दहा हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई मंगळवारी (दि. १५) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्पाइन रोडवर करण्यात आली.

मारुती महादेव चोरमले (वय ५३, मंडल अधिकारी, शिवणे) आणि जयेश बाळासाहेब बारमुख (वय ३३, रा. चांदखेड, मावळ) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी ४६ वर्षीय व्यक्तीने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारदाराच्या बहिणीसह २१ जणांनी कुसगाव, मावळ येथील ३८ गुंठे जमीन बांधकाम व्यावसायिकाकडून करारनाम्याने विकत घेतली होती. मात्र, त्याच जमिनीची दुसऱ्याशी विक्री झाल्याने फेरफाराच्या प्रक्रियेत वाद निर्माण झाला. या फेरफारामध्ये तक्रारदाराच्या बाजूने निर्णय देण्यासाठी मंडल अधिकारी चोरमले याने दोन लाखांची लाच मागितली होती. बारमुख याने स्वतःसाठी १० हजार रुपये मागितले होते.




तक्रारीनुसार एसीबीने सापळा रचून मंगळवारी स्पाइन रोडवरील एका रुग्णालयासमोर दोघांनाही लाच घेताना अटक केली. चोरमले याने दोन लाख रुपये रोख स्वरूपात, तर बारमुख याने १० हजार रुपये ऑनलाइन माध्यमातून स्वीकारले. एसीबीचे सहायक पोलीस आयुक्त दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# कंपनीतील कर्मचाऱ्यांना घेऊन निघालेल्या खाजगी बसची एसटीला जोरदार धडक; 13 जण जखमी

**पिंपरी । प्रतिनिधी**

चाकण येथील कंपनीतील कर्मचाऱ्यांना घेऊन निघालेल्या खाजगी बसने एसटी बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात खाजगी बसमधील १३ जण जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी (दि.१६) सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत देहू फाटा येथे घडली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, चाकण येथील खाजगी कंपनीतील कर्मचाऱ्यांना घेऊन खाजगी बस देहू फाटा येथून जात होती. दरम्यान, परळ डेपोच्या एसटी बसला खाजगी बसने पाठीमागून धडक दिली. या अपघातात खाजगी बसमधील १३ जण जखमी झाले आहेत. बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच एसटी बसमधील प्रवाशांना कोणतीही इजा झाली नाही. या अपघाताचा तपास तळेगाव एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

# संचालक मंडळ कारभाराची कालमर्यादेत चौकशी करा; खासदार सुळे यांची पणनमंत्र्यांकडे मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे बाजार समिती संचालक मंडळाच्या गैरकारभाराची राज्यात चर्चा आहे. विधी मंडळात अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजार समितीच्या कारभाराची समिती नेमून उच्चस्तरीय चौकशी करण्याची घोषणा पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केली आहे.



या प्रकरणात आता खासदार सुप्रिया सुळे मैदानात उतरऱ्या आहेत. दोन महिन्यांत चौकशी करण्यात येईल,असे पणन मंत्र्यांनी म्हटले आहे. त्याप्रमाणे कालमर्यादिमध्ये चौकशी करण्याची मागणी खासदार सुळे यांनी पणन मंत्र्याकडे केली आहे. तसेच, चौकशी दोषी आढळणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचेही त्यांनी म्हटले आहे. रावल यांना दिलेल्या निवेदनात सुळे यांनी म्हटले आहे की, पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती येथे विद्यमान संचालक मंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता व गैरकारभार झाल्याच्या तक्रारी आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन सचिव व प्रदेश प्रवक्ते विकास लवांडे यांनी हा विषय वेळोवेळी उघडकीस आणला आहे. संचालक मंडळाने केलेल्या गैरकारभारामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत आहे. त्यांच्या कारभाराबाबत विविध संघटनांच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या लेखी तक्रारी पणन संचालक यांच्याकडे सादर केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कालमर्यादेमध्ये चौकशी करण्याची मागणी सुळे यांनी केली आहे.

# आंबेगावात ४० लाखांची रोकड हिसकवणारा 'मित्र' निघाला

**पुणे । प्रतिनिधी**

**धाराशिवमधील एका स्टिल व्यावसायिकाची ४० लाखांची रोकड हिसकावलेल्या गुन्ह्याचा आंबेगाव पोलिसांनी चोवीस तासांच्या आत छडा लावला आहे. याप्रकरणी तिघांना भूगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले असून, त्यामध्ये एका विधिसंघर्षित मुलाचा समावेश आहे. व्यावसायिकाच्या मित्रानेच आपल्या इतर साथीदारांसोबत मिळून ही रोकड लुटल्याचे समोर आले आहे. त्यासाठी व्यावसायिकाच्या गावापासून थेट पुण्यापर्यंत पाठलाग करण्यात आला.**

प्रदीप रामदास डोईफोडे (रा. इंगळेनगर, भूगाव), मंगेश दिपील ढोणे (रा. हडपसर, मूळ. येडशी, धाराशिव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी अभिजित विष्णू पवार (वय ३२, रा. रामलिंगनगर,



येडशी, जि. धाराशिव) यांनी आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी तीन अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

मंगळवारी (दि.१५) सकाळी पावणेनऊ वाजण्याच्या सुमारास आंबेगावमधील बाबजी पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर पवार आणि त्यांचा मित्र ढोणे रस्त्याने पायी चालत निघाले होते. त्या वेळी ढोणेच्या खांद्यावर असलेली बॅग चोरट्यांनी पळवली. हा सर्व लुटीचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. भरदिवसा रोकड लुटीच्या घटनेमुळे खळबळ उडाली होती. व्यावसायिक पवार आणि ढोणे हे दोघे एकमेकांचे जवळचे मित्र आहेत. ढोणेला पवार यांच्या आर्थिक उलाढालीबाबत माहिती होती. तेदेखील पुण्यात आले, की ढोणेला सोबत घेऊन आर्थिक व्यवहार करत असत. पुण्यातील बांधकाम व्यावसायिकांना पुरविलेल्या मालाचे पैसे जमा करण्यासाठी पवार बुधवारी रात्री पुण्याला निघणार असल्याचे ढोणेला माहिती होते. ढोणेला पैशांची हाव झाली. त्याने ही माहिती त्याच्या ओळखीच्या एका व्यक्तीला दिली. तोदेखील धाराशिव जिल्ह्यातील राहणारा. ढोणे आणि इतर तिघांनी ही रोकड लुटण्याची योजना आखली. त्यासाठी पुण्यातून साथ दिली ती डोईफोडे याने.

त्याचीच थार गाडी गुन्हा करण्यासाठी वापरली. रोकड हिसकावल्यानंतर आरोपींनी खेड, पाटस, जामखेडमार्गे धाराशिव जिल्हा गाठला. रोकड हिसकावताना डोईफोडे याच्यासोबत आणखी दोघे होते. पवार गावातून निघाल्यापासून त्यांच्या ट्रॅव्हल्सचा स्कॉर्पिओ गाडीने पाठलाग करण्यात आला. पवार यांच्या ओळखीच्या विधिसंघर्षित मुलाने याबाबतची टीप ढोणेला दिली. त्यानंतर ढोणे याने इतर दोघा आरोपींच्या संपर्कात राहून डोईफोडेमार्फत ही लूट केल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून ९ लाख ३५ हजारांची रोकड, गुन्ह्यात वापरलेली थार गाडी, पाच मोबाइल जप्त करण्यात आले आहेत.

# लोहगाव विमानतळावरून लवकरच १५ नवीन मार्गांवर विमानसेवा-मुरलीधर मोहोळ

**पुणे । प्रतिनिधी**

लोहगाव विमानतळावरून सध्या ३७ शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असून, यात लवकरच १५ नवीन मार्गांची भर पडणार आहे. नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली असून, यामुळे पुणेकरांसाठी हवाई प्रवासाचे आणखी पर्याय उपलब्ध होणार आहेत. पुणे विमानतळाला मंजूर झालेल्या १५ नवीन स्लॉटसाठी मार्गांची निश्चिती करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. येत्या काही दिवसांत हे काम पूर्ण होईल आणि त्यानंतर या नवीन मार्गांवरून विमानसेवा सुरू होईल, असे मोहोळ यांनी सांगितले.

या विस्ताराबाबत बोलताना राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुणे हे एक महत्त्वाचे




शहर असून, येथील हवाई कनेक्टिव्हिटी वाढवणे ही आमची प्राथमिकता आहे. लवकरच पुणे विमानतळावरून १५ नवीन मार्गांवर विमानसेवा सुरू होईल, ज्यामुळे पुणे आणि आसपासच्या नागरिकांना देशातील विविध शहरांशी जोडणी साधणे अधिक सोयीचे होईल. यामुळे पर्यटन आणि व्यवसायालाही चालना मिळेल.

सध्या पुणे विमानतळावरून देशातील ३७ प्रमुख शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध आहे. नवीन १५ मार्गांच्या समावेशामुळे पुणे विमानतळाची क्षमता आणि कनेक्टिव्हिटी लक्षणीय वाढणार आहे, ज्यामुळे प्रवाशांना अधिक पर्याय आणि सोयीस्कर प्रवास अनुभवता येईल. ही वाढती हवाई कनेक्टिव्हिटी पुणे शहराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासालाही गती देईल अशी अपेक्षा आहे. या नव्या मार्गांमध्ये जयपूर, गुवाहाटी, श्रीनगर, देहरादून, रांची, जबलपूर, अमृतसर, सूरत, वडोदरा, कोझिकोड, त्रिवेंद्रम,भुवनेश्वर आणि मोपा विमानतळ यांसारख्या शहरांचा समावेश होण्याची शक्यता आहे. काही मार्गांवर सध्या असलेल्या सेवांची वारंवारिता वाढवण्याचेही नियोजन आहे.

पुणे विमानतळावरून दररोज सरासरी २०० विमानांची वाहतूक होते.दररोज सुमारे ३५ हजार प्रवाशांची वाहतूक होते. औद्योगिक, शैक्षणिक, संरक्षण आणि पर्यटन क्षेत्रासाठी महत्त्वाचे असलेल्या पुण्याहून थेट विमानसेवांची वाढ ही शहराच्या दृष्टीने सकारात्मक बाब ठरत आहे.

# पुणे जिल्ह्यात अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत पशु आरोग्य शिबिरे

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज यांच्या वतीने पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये मोफत पशु आरोग्य तपासणी शिबिरे राबवली जात आहेत. हा उपक्रम ७ जुलैपासून सुरू झाला असून ३१ जुलैपर्यंत चालणार आहे.

या उपक्रमांतर्गत आंबेगाव, जुन्नर, खेड, भोर, दौंड, पुरंदर, शिरूर, हवेली आणि राजगड (वेल्हा) या तालुक्यांमधील विविध गावांमध्ये आजवर शिबिरे आयोजित करण्यात आली असून शेतकऱ्यांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. नुकत्याच पार पडलेल्या १६ जुलै रोजीच्या शिबिरांमध्ये थोरांदळे (आंबेगाव), आव्हाळवाडी (हवेली) आणि नाझरे सुपे (पुरंदर) या गावांमध्ये एकूण २९६ जनावरांची तपासणी करण्यात आली.

या शिबिरांमध्ये जनावरांची आरोग्य




तपासणी करून संभाव्य आजारांचे निदान केले जात आहे. त्याचबरोबर जनावरांना लागणाऱ्या जंतनाशक आणि गोचीडनाशक औषधांचे मोफत वाटपही करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी संघाच्या इनपुट विभागामार्फत विविध सेवा आणि योजनांची माहिती दिली जात असून त्यात खालील गोष्टींचा समावेश आहे –

कात्रज पशुखाद्य (कात्रज १०, २०, २० प्लस, काल्फ स्टार्टर), कडबा कुट्टी मशीन, मिल्किंग मशीन, मिनरल मिक्सचर, चारा बियाणे, मुरघास बॅग, कृत्रिम रेतन सुविधा, पशुवैद्यकीय औषधे, आयव्हीएफ सेवा, जंतनिर्मूलन, स्वच्छ दूध उत्पादन व सेंद्रिय खते यांसारख्या आधुनिक सुविधा. या उपक्रमाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करताना संघाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज लिमये यांनी सांगितले, या शिबिरांच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेता येईल. यामुळे जनावरांची उत्पादकता वाढेल आणि आजारांचे प्रमाण कमी होईल.

संघाचे चेअरमन ॲड. स्वप्नील ढमढेरे यांनी सांगितले की, अजितदादांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही ८५ दूध संस्थांमधील शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करत आहोत. यामुळे दूध उत्पादन वाढीसोबतच पशुधनाचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. या शिबिरांसाठी जिल्ह्यातील विविध भागांमध्ये तीन विशेष वैद्यकीय पथके तयार करण्यात आली असून ते नियोजनबद्ध पद्धतीने गावोगावी फिरून सेवा देत आहेत. पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आपल्या जनावरांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची संधी मिळाली आहे. अशा प्रकारचे उपक्रम शेतकऱ्यांच्या हिताचे ठरून, ग्रामीण भागाच्या समृद्धीकडे एक पाऊल ठरतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# थेरगावमध्ये साखळी उपोषणाने पेटली जनभावना !

## डीपी रस्ता रद्द करा, प्रॉपर्टी कार्ड द्या - धनाजी यळेकर पाटील यांची मागणी

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

थेरगाव परिसरातील गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांवर अन्याय करणाऱ्या डीपी रस्त्याच्या प्रस्तावाला विरोध करत स्वाभिमानी घर बचाव संघर्ष चळवळीच्या वतीने साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. धनाजी यळेकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक नागरिकांचा आवाज बुलंद होत आहे.

थेरगाव व परिसरातील शेकडो रहिवाशांना त्यांच्या जमिनीवरून बेघर करण्याचा घाट डीपी रस्त्याच्या नावाखाली घातला जात आहे, असा आरोप करताना यळेकर म्हणाले, हा डीपी रस्ता फक्त नकाशांमध्ये आखलेला आहे. प्रत्यक्षात त्याचा तळमुळातून विरोध आहे. त्यामुळे तो रद्द करून नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावीत.

ते पुढे म्हणाले, स्थानिक आमदारांनी संसदेत या विषयावर प्रश्न उपस्थित केला खरा, पण तो दिशाभूल करणारा होता. त्यांनी स्पष्ट भूमिका घ्यायला हवी होती, मात्र त्यांनी फक्त राजकीय सोयीसाठी प्रश्न मांडला.

दैनिक राज्य लोकतंत्रशी बोलताना, धनाजी यळेकर पाटील यांनी महानगरपालिका आयुक्त शिखर सिंह यांच्यावरही थेट निशाणा साधला.आयुक्तांनी या प्रकल्पातून नेमकं काय साध्य करायचं आहे? गरीबांना रस्त्यावर आणून विकासाचा कोणता आदर्श उभा करायचा आहे? हेच समजत नाही, असे म्हणत यळेकर पाटील यांनी प्रशासनाच्या धोरणांवर ताशेरे ओढले. थेरगावमधील नागरिकांची ही लढाई केवळ जमिनीच्या संरक्षणासाठी नसून, आपल्या अस्तित्वासाठी आहे, असे चित्र सध्या निर्माण झाले आहे. प्रशासनाने या संघर्षाची दखल न घेतल्यास, आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यळेकर पाटील यांनी दिला.